# प्रकरण – १ ले

# प्रास्ताविक

भारत ही संतांची भूमी म्हणून ओळखल्या जाते. एक दीर्घ संत परंपरा भारताला लाभली आहे. महाराष्ट्र राज्याचा विस्तार करू जाता ही परंपरा प्रकर्षाने जाणवल्याशिवाय राहत नाही. समाजसुधारणेच्या कार्यामध्ये संतांनी आपली अमिट छाप सोडली आहे. खऱ्या अर्थाने संत हे अध्यात्मिक मार्गाने समाजसुधारणा करणारे खरे समाजसुधारकच होते. सामाजिक आणि सांस्कृतिकदृष्ट्या एक आगळीवेगळी, एक नवीन जीवनदृष्टी संतांनी आपल्याला प्रदान केली आहे. संतांनी आपल्या विविध साहित्यप्रकारांच्या माध्यमातून वेगवेगळ्या काळात हा जीवनदृष्टी दृगोच्चर केली आहे. याच जीवनदृष्टीचे सामाजिक, सांस्कृतिक तथा वाङ्मयीन पैलू स्वयंभू संतसाहित्यातून दृष्टीगोचर होत राहिले. संतसाहित्याने आपल्या अंगभूत वैशिष्ट्यांतून साहित्याचा प्रांतात आपली ओळख स्वतंत्रपणे व्हावी, अशाप्रकारचा प्रभाव निर्माण केला आहे. म्हणूनच पंत आणि तंत या परंपरांपेक्षा संतसाहित्याची परंपरा वेगळी उठून दिसते. निश्चितच हे संतसाहित्याचे यश आहे. अगोदर म्हटल्याप्रमाणे संत हे खऱ्या अर्थाने समाजसुधारक होते. संतसाहित्याने समाजसुधारणेचे एक मोठे व्रत हाती घेतले आहे. एक समाजसुधारक म्हणून कार्य करीत असतांना समाजात पसरलेल्या वेगवेगळ्या अनिष्ट बाबींवर प्रहार करून संतांनी पर्यायाने संतसाहित्याने समाजाला नेहमी नवी दिशा देण्याचा प्रयत्न केलेला दिसून येतो.

ज्या-ज्या कालखंडात संत जगले त्या-त्या कालखंडातील सामाजिक समस्यादेखील वेगवेगळ्या होत्या म्हणून या सर्व संतांची कार्य करण्याची पध्दती सुध्दा वेगवेगळी होती. परंतू एक समस्या मात्र या सर्व कालखंडात समान असलेली अभ्यासाअंती लक्षात येते ती समस्या म्हणजे ‘अंधश्रध्दा’ होय.

भारतीय समाज हा अंधश्रध्देवर जबर विश्वास ठेवून जगणारा समाज आहे. धर्म येथल्या रक्तारक्तात भिनलेला आहे. शतकानुशतके भारतीय समाज अंधश्रध्देच्या खोल गर्तेत बुडालेला असलेला दिसून येतो. संतांच्या साहित्याने अंधश्रध्देच्या अंधारात बुडालेल्या समाजाला बाहेर काढण्याचे प्रयत्न करून करून आपल्या वाणीने समाजप्रबोधन केले. भारताच्या ह्या प्रश्नांच्या संदर्भात विचार करतांना नवे-नवे सूर, नवे-नवे पदर व ह्या घटकांच्या अनुषंगाने साकारल्या जाणाऱ्या प्रेरणाबंधाची मांडणी गवसली. संतश्रेष्ठ तुकाराम महाराज यांनी केलेल्या अंधश्रध्दा निर्मूलनाच्या प्रयत्नांचा चिकित्सक अभ्यास सदर प्रबंध लेखनात अपेक्षित आहे.

वेगवेगळ्या संतांच्या साहित्यात आलेले अनुभव विश्व व्यामिश्र स्वरूपाचे आहे. परंतू संतसाहित्यात एक समानता आहे ती म्हणजे त्यांनी अंधश्रध्देवर केलेला प्रहार. आपण आज एकविसाव्या शतकात म्हणजेच विज्ञानयुगात वावरत आहोत तरीही समाजातून अंधश्रध्दा पुर्णतः कालबाह्य झाली हे अद्यापपावेतो आपण ठामपणे सांगू शकत नाही, अनेक तळ ठोकून आहेत. अनेक प्रकारच्या अनिष्ट प्रथा, परंपरा, रूढी, जत्रा, यात्रा आणि पापपुण्याच्या कल्पना यामध्ये बरेच काही कालबाह्य असते.

आजही अनेक प्रकारची कर्मकाण्डे, पशुहत्या आणि व्रतवैकल्ये सुरूच आहे. या सर्व प्रकारातून समाजाची फसवणूक, छळ, लुबाडणूक आजतागायत सुरू आहे. ही बाब लक्षात घेतली तर ही गोष्ट सहज लक्षात येते की, आज तर ही स्थिती असेल तर आजपासून सातशे वर्षांपूर्वी काय परिस्थिती असेल. त्या परिस्थितीची कल्पना न केलेलीच बरी. अशा कठीण समयी संतवाङ्मयाने केलेले कार्य खरोखरच फार उल्लेखनीय ठरते. संत तुकारामांच्या कालखंडात त्यांनी केलेले समाजसुधारणेचे कार्य किती अवघड होते हे सहज लक्षात येते. समाजामध्ये पौराहित्य, भटगिरी त्याकाळी बोकाळली होती. भोंदूगिरी समाजाचे नैतिक अधःपतन होत चालले होते. एकंदरित पूर्ण समाज अंधश्रध्देच्या आहारी जावून सैरभैर अडकलेल्या नौकेसारखी स्थिती झालेल्या सामान्य व्यक्तीला दीपस्तंभ बनून संतश्रेष्ठ तुकारामांनी मार्ग दाखविला.

'जेयांच्या लीळेमाजी नीती | जियाली असे ||'

या संत ज्ञानेश्वरांच्या उक्तीनुसार अशांच्याच आचरणाचे यथाशक्ती अनुकरण करण्याची बुध्दी समाजाला होते. एखादे ज्ञानेश्वर व तुकाराम जन्माला आल्यानंतर त्यांनी केलेल्या उद्बोधनाचा परिणाम समाजमनावर सातशे वर्षांपेक्षा जास्त काळ टिकून राहतो हे त्या संतांच्या विचारांचे अक्षरतत्व नव्हे तर काय ? समाजाला योग्य वळण लागावे, अंधश्रध्देसारखे कलंक दूर व्हावे, हे संतकार्याचे खरे उद्दिष्ट पार्श्वभूमी तपासल्यावर लक्षात येते. 'जगा व जगू द्या' या वचनानुसार सदैव सत्प्रवृत्त राहून ईश्वर परायणतेने स्वतःच्या व पर्यायाने समाजाच्या कल्याणाकरिता त्यांनी प्रवृत्त व्हावे, हीच तळमळ आजपर्यंतच्या संतसाहित्यातून दिसून येते.

"बुडता हे जन न देखवे डोळा|

म्हणवून कळवळा येत असे ||"

या स्वतः संत तुकारामांच्या अभंगातून समाजाबद्दलचा त्यांच्या मनात असलेला कळवळा दिसून येतो. या कळवळ्यापोटीच अंधश्रध्दा निर्मूलनाच्या माध्यमातून समाजशुध्दीचे कार्य त्यांच्या हातून होता असते. मतलबी आणि लबाड लोकांपासून कर्मकांडांच्या, पाप-पुण्यांच्या भ्रामक कल्पनांपासून समाजाची ससेहोलपट थांबावी, याकरिताचा संत तुकारामांनी हे कार्य हाती घेतलेले दिसून येते. पुर्णतः मार्ग भटकलेल्या समाजाला अर्थशुण्य कर्मकाण्ड, अस्पृष्यता, विषमता, विटाळ-चांडाळ, देव-देवस्की, नवस-सायास, यज्ञकर्म यासारख्या अपप्रवृत्तीच्या नादी लागलेल्या जनसमुदायाला तुकारामांनी आपल्या अभंगातून त्यातील फोलपणा पटवून दिला व त्यांना सन्मानाने जगण्याकरिता प्रवृत्त केले. म्हणूनच संत तुकाराम महाराजांच्या अंधश्रध्दा निर्मूलनाच्या कार्याचा चिकित्सक पध्दतीने अभ्यास करण्याचा प्रयत्न प्रस्तुत लघुशोध प्रबंधात करण्यात येणार आहे.

## अभ्यासाची आवश्यकता :

भारताचे माजी राष्ट्रपती दिवंगत ए. पी. जे. अब्दूल कलाम यांनी म्हटल्याप्रमाणे २०२० पर्यंत भारत जागतिक महासत्ता म्हणून पुढे येईल. परंतू हे होण्यामध्ये सर्वात मोठा अडसर जर कोणता असेल तर तो अंधश्रध्देचा. भारतीय समाजमनात शेकडो वर्षापासून आजपर्यंत रूतून बसलेल्या अंधश्रध्देला समाजातून हद्दपार करण्याचा महनीय प्रयत्न संत तुकारामांनी केला.

समाजातून अंधश्रध्दा नष्ट करून समाज परिवर्तन घडवून आणण्यासाठी तुकारामांच्या अभंगातील डोळस दृष्टीची आज समाजमनाला खरी गरज आहे. कर्नाटकातील महात्मा बसवेश्वरांपासून थेट कर्मयोगी गाडगेबाबांपर्यंत सर्वच संतांनी समाजाला मानवधर्म शिकविण्याचा प्रयत्न केला आहे. या सर्व संतांच्या प्रयत्नांमध्ये संत तुकारामांचे नाव अग्रक्रमाने घ्यावे लागते. एवढे असूनसुध्दा आजच्या यंत्रयुगातही ही अंधश्रध्दा मनामनात घर करून बसलेली आहे.

संत तुकाराम महाराजांचे साक्षेपी विचार आज घराघरात पोहोचण्याची आवश्यकता आहेक. अंधश्रध्दा निर्मूलनासाठी तुकाराम महाराजांचे विचार ‘रामबाण औषध’ ठरेल यात शंका नाही. संत तुकाराम यांच्या अंधश्रध्दा विरोधी विचारातून ‘नवसमाज’ निर्माण करण्याच्या दृष्टीने सदर विषयाचे संशोधन करण्याची आज खऱ्या अर्थाने गरज आहे.

सदर संशोधन विषयाची व्याप्ती निश्चितच फार मोठी आहे. सदर लघुशोध प्रबंध साकार करीत असतांना तुकारामांच्या अंधश्रध्दाविरोधी विचारांसोबतच त्यांच्याशी संबंधीत विचारांचाही अभ्यास केल्या जाईल.

# (१) आधुनिक युग आणि अंधश्रध्दा

## १.१ अंधश्रध्दा निर्मुलन आणि संत तुकारामांची भूमिका

आजच्या आधुनिक युगात अंधश्रध्देची पाळेमुळे शोधणे व अनिष्ट रूढी-प्रथा यांची कालबाह्यता शोधणे हे मुख्य उद्दिष्ट संशोधन करतांना पुढे ठेवले आहे. भारताचा विचार करता धर्मनिरपेक्षता या मुल्याचा पुरस्कार करून सामाजिक न्याय प्रस्थापित करण्याचा प्रयत्न करणे अत्यंत गरजेचे आहे. अंधश्रध्देसारख्या अनिष्ट, समाजविघातक प्रथेला विरोध करून समाजामध्ये वैज्ञानिक दृष्टीकोन निर्माण करणे ही आजच्या काळाची गरज बनली आहे. अंधश्रध्दा निर्मूलनात अत्यंत महत्वाची भूमिका बजाविणाऱ्या संतश्रेष्ठ तुकाराम महाराजांच्या अभंगातून अंधश्रध्दाविरोधी कार्याचे कालखंडानुसार अध्ययन करण्याची आज खरी आवश्यकता आहे. अंधश्रध्दा निर्मूलनाचेअनेक प्रयत्न आजवर झालेले आहेत आणि होतही आहेत. त्याच अंधश्रध्दा निर्मूलनाचे आजवरचे झालेले प्रयत्न शोधणे तथा अंधश्रध्दा निर्मूलनाच्या मार्गातील उणिवा शोधून काढणे अत्यंत महत्वाचे झाले आहे. आज खऱ्या अर्थाने सत्य-असत्याच्या कसोटीवर अंधश्रध्देसंबंधी शहानिशा करणे क्रमप्राप्त ठरले आहे. अंधश्रध्दा निर्मूलनाच्या कार्यात संत तुकाराम महाराजांच्या कार्यपध्दतीचा अभ्यास चिकित्सक पध्दतीने करण्याचा प्रयत्न प्रस्तूत प्रबंधातून करण्यात येत आहे. अंधश्रध्दा निर्मूलनात तुकाराम महाराजांच्या अभंगाचे स्थान जाणून घेणे अत्यंत महत्वाचे आहे. संत तुकारामांच्या अभंगातून अभिव्यक्त झालेले विचार आधुनिक युगात हितावह आहे म्हणूनच त्यांचे वाङ्मय हे अक्षरवाङ्मय ठरते. अंधश्रध्दा निर्मूलनाच्या मार्गातील अडचणींवर उपाययोजना संतश्रेष्ठ तुकाराम महाराजांच्या अभंगातून आपणास सापडल्याशिवाय राहात नाही.

संतपरंपरेमध्ये तुकाराम महाराजांचे स्थान अढळ आहे. अंधश्रध्दा निर्मूलनात तुकारामांच्या अभंगाचे महत्वाचे स्थान आहे. प्राचीन काळासोबतच

आधुनिक युगातसुध्दा अंधश्रध्देचे अस्तित्व दिसून येते. म्हणून खऱ्या अर्थाने तुकारामांच्या अभंगांच्या अभ्यासाची गरज आहे. भारत एक विकसित राष्ट्र म्हणून पुढे येण्याच्या मार्गातील सर्वात मोठा अडसर अंधश्रध्देचा आहे. हीच अंधश्रध्दा दूर करण्याचा प्रयत्न संत तुकाराम महारजाांनी आपल्या अभंगातून केला. एकंदरित सामाजिक जीवनावर अंधश्रध्देचा अनिष्ट परिणाम होत आहे. आजही अंधश्रध्दा कायम असण्याचे कारण म्हणजे संतवाङ्मयातून अभिव्यक्त झालेला संदेश पुर्णपणे अंमलात आणल्या जात नाही. अंधश्रध्देमुळे सामाजिक विषमता निर्माण होत आहे.

## १.२ भागवत धर्माच्या इमारतीचे कळस :

संत बहिणाबाईंनी गौरव केल्याप्रमाणे तुकाराम महाराज भागवत धर्माच्या इमारतीचे कळस ठरले यावरून संत मालीकेत त्यांचे स्थान लक्षात येते. ज्याचा प्रपंच फसला, पूर्ण धंदा बुडाला, समाजामध्ये ज्याची हेटाळणी झाली, समाजाने ज्यांना वाळीत टाकले, कर्जबाजारी झाले परंतू हे सर्व सहन करून जो आपल्या भूमिकेवर ठाम राहिले व 'बुडता हे जन न देखवे डोळा' म्हणवुनी कळवळा येत असे' अशाप्रकारे समाजातील जनसामान्यांविषयी कळवळा येवून समाजाकरिता अखेरच्या श्वासापर्यंत इमारतीचा कळस म्हणजे संत तुकाराम होय.

ज्ञानेश्वर, नामदेव, एकनाथ यांनी सुरू केलेली समाजोध्दाराची चळवळ वेगळ्या पध्दतीने संत तुकाराम महाराजांनी पुढे चालविली. त्याकाळी लोकांचे प्रबोधन करणे तेवढे सोपे काम नव्हते कारण कित्येक शतकांपासून पूर्ण समाज या जंजाळात सापडला होता. म्हणून त्यांचे प्रबोधन करायचे झाल्यास त्यांच्या मनाचा ठाव घेणे गरजेचे आहे, त्यांना आपलेसे करणे गरजेचे होते ही बाब नेमकी तुकाराम महाराजांनी ओळखली. लोकरंजनाच्या माध्यमातून आपला विचार लोकांच्या गळी उतरविण्यास तुकोबा सज्ज झाले. लोकरंजनाच्या

माध्यमातून लोकशिक्षण देणारे तुकाराम म्हणूनच खरे लोकशिक्षक ठरतात. समाजप्रबोधनाकरीता किर्तन आणि अभंग या अभिनव साहित्यप्रकारांचा वापर त्यांनी करून घेतला आणि जनमानसाच्या मनाचा ठाव त्यांनी घेतला. किर्तन आणि अभंग या प्रकारांचा एवढा प्रभावी वापर तुकाराम महाराजांएवढा क्वचितच कोणी केला असेल. किर्तन आणि अभंगाचा वापर त्यांनी साध्य म्हणून न करता साधन म्हणून करून घेतला. कलेसाठी कलेपेक्षा जीवनासाठी कला हे सुत्र येथे तंतोतंत लागू पडते.

## १.३ समाजव्यवस्थेविरूध्द बंड

खऱ्या अर्थाने तुकाराम महाराज व्रिद्रोही होते. प्रस्थापित व कुजलेल्या समाजव्यवस्थेविरूध्द त्यांनी बंड उभारले होते म्हणून त्या समाजव्यवस्थेमध्ये ते बंडखोर ठरतात. म्हणूनच आपल्या एका अभंगात ते म्हणतात –

‘कोणी निंदा कोणी वंदा |

आम्हां स्वहिताचा धंदा ||

काय तुम्हासी गरज |

आम्ही भजू पंढरिराज ||

अशा रोखठोक शब्दात ते निंदानालस्ती करणाऱ्याचा समाचार घेतात.

संत तुकाराम महाराजांचा जन्म अतिशय श्रध्दाळू कुटूंबात इ.सन १५९८ साली झाला. त्याकाळची सामाजिक परिस्थिती अतिशय बिकट होती. मनुष्याचा जगण्याचा हक्कच प्रस्थापित समाजव्यवस्थेने नाकारला होता. अध्यात्मिक क्षेत्र दुषित झाले होते. अंधश्रध्देचा बाजार सर्वत्र मांडल्या गेला होता. ढोंगी साधूंचा,

भोंदूंचा सर्वत्र सुळसुळाट झाला होता. मनुष्याच्या अधःपतनाचा तो काळ होता. रामेश्वर भट्टांसारखे कलुषित बुध्दीच्या पुरोहितांचे समाजात वर्चस्व वाढत चालले होते. यज्ञ-याग, जंत्र-मंत्र यांचे स्तोम सर्वत्र वाढले होते. चमत्कारांवर लोकांचा विश्वास वाढत चालला होता. खुद्द तुकारामांच्या जीवनाशीच असे अनेक चमत्कार जोडले गेले, मग त्यांचे सदेह वैकुंठाला जाणे असो किंवा इंद्रायणीत बुडविलेल्या अभंगाच्या वह्या जशाच्या तशा वर येणे असो. परंतू राजा मंगळवेढेकर म्हणतात त्याप्रमाणे 'चमत्काराकडे चमत्कार म्हणूनच पाहावे' हेच खरे ठरते.

पुजाविधी, बळीप्रथा ज्या काळात वाढीस लागले होते त्यावेळी संत तुकाराम महारजांनी त्यातील फोलपणा समाजापुढे आणला. त्यावेळी समाजामध्ये सामाजिक, धार्मिक आणि आर्थिक विषमता मोठ्या प्रमाणात वाढीस लागली होती. सर्वत्र अराजकता पसरत चालली होती. भयंकर दुष्काळामुळे परिस्थिती अधिकच गंभीर झाली होती. अशा भयंकर वातावरणात तुकोबांचे कार्य अतिशय महत्वाचे ठरते. अंधश्रध्देला समाजातून हद्दपार करण्याचा जणू तुकाराम महाराजांनी विडाच उचलला होता. तुकाराम महाराजांनी आपल्या कीर्तनाच्या माध्यमातून समाजद्रोह्यांना चांगलेच ठणकावले. हे सर्व करीत असतांना त्यांना अनेकांच्या विरोधाचा सामनासुध्दा करावा लागला. समाजाला अंधश्रध्देच्या विळख्यातून बाहेर काढण्याकरिता तुकोबांनी समाजाला खरा धर्म आणि खरे अध्यात्म शिकविले. कुटूंबाच्या पाशातून तुकाराम महाराज पुर्णतः मुक्त होवून समाजालाच त्यांनी आपले कुटूंब मानले होते.

त्यांच्याच अभंगानुसार -

'पोर मेले बरे झाले | देवे मायेविरहित केले ||

माता गेली मजदेखता | तुका म्हणे हरलो चिंता ||'

अशाप्रकारे सर्व पाशातून मुक्त होवून समाजदेवाची पुजा करण्यास संत तुकोबा सज्ज झाले होते. फक्त सावरकारशाही संपावी एवढे सांगूनच तुकोबा थांबले नाही तर त्यांनी स्वतःपासूनच सुरूवात केली. त्यांच्याकडून कर्ज घेतलेल्या लोकांच्या गहानवह्या त्यांनी स्वतः नष्ट करून सर्वांना कर्जमुक्त केले.

देवधर्माचे स्तोम माजविणाऱ्या दांभिकांचा त्यांनी चांगलाच समाचार घेतला. देव दगडात नाही तर नडलेल्या, गांजलेल्या लोकांमध्ये आहे हा संदेश त्यांनी आपल्या अभंगातून समाजाला दिला.

‘जे कां रंजले गांजले |

त्यांसि म्हणे जो आपुले ||

तोचि साधु ओळखावा |

देव तेथेंचि जाणावा ||

अशी सरळसोपी शिकवण त्यांनी समाजाला दिली. बाह्य सोपस्कार आणि अवडंबरापासून सावध राहण्याचा सल्ला त्यांनी समाजाला दिला.

## १.४ संत तुकारामांचा बुध्दीप्रामाण्यवाद

संत तुकाराम महाराज पेशाने एक व्यापारी होते. आपल्या आयुष्याच्या शेवटपर्यंत त्यांनी समाजसुधारणेचा व्यापार केला. त्यांनी आपले संपुर्ण आयुष्य समाजासाठी वेचले, त्याकरिता अभंग आणि कीर्तनाचे शस्त्र त्यांनी वापरले. पोट भरण्याकरीता कीर्तनाचा वापर करणाऱ्याला त्यांनी चांडाळ म्हणून हिनवले. कीर्तनावर त्यांचा असलेला विश्वास यावरून दिसून येतो.

त्यांचा बुध्दीप्रामाण्यवाद कोणालाही सहज पटण्यासारखा आहे. आपल्या एका अभंगात ते म्हणतात –

‘वैद्य वाचविती जीवा | हरी कोणध्याते देवा ||१||

काय जाणो कैसी परी | प्रारब्ध ते ठेवी उरी ||२||

जंगी दैवत संचारे | मग तेथे काय उरें ||३||

नवसे कन्यापुत्र होती | तरी का करणे लागे पती ||४||’

अशा सोप्या बुध्दीप्रामाण्यांतून त्यांनी समाजात जागृकता निर्माण केली. खऱ्या अर्थाने एका संशोधकाचीच भूमिका त्यांनी आपल्या आयुष्यात पार पाडली. ढोंगी लोकांच्या नादातून सर्वसामान्यांना बाहेर काढून सर्वांना परवडेल असा देव त्यांनी सर्वसामान्यांना दिला. कोणत्याही बाह्य अवडंबराला लाथाडून नामस्मरणाचा सोपा मंत्र त्यांनी समाजाला दिला. मोक्षप्राप्तीच्या मागे न लागता मनाला प्रसन्न करण्याचा सल्ला त्यांनी लोकांना दिला. हे सर्व करतांना शब्दावरचा विश्वास त्यांनी जराही ढळू दिला नाही.

‘आम्हा घरी धन शब्दांचीच रत्ने |

शब्दांचीच शस्त्रे यत्न करूं ||

शब्दचिं आमुच्या जीवाचे जीवन |

शब्दे वांटू धन जनलोका ||

अशारितीने शब्दावर असणारा विश्वास त्यांनी व्यक्त केला. समाजामध्ये अंधश्रध्देचे स्तोम माजविणाऱ्या दांभिकाचा आपल्या अंभगाच्या माध्यमातून त्यांनी चांगलाच समाचार घेतला.

‘मऊ मेणाहून आम्ही विष्णूदास |

कठिण वज्रास भेदूं ऐसे ||

मेले जित असों निजोनियां जागे |

जो जो जें जे मागे तें ते देऊ ||

भले तरी देऊ कांसेची लंगोटी |

नाठाळाचे काठी देऊ माथा ||’

# प्रकरण – २ रे

# परमात्मा व समाज यामध्ये समन्वय

## २.१ अनिष्ट प्रथांना विरोध

त्यांचे अभंग जागृती आणि आचारसंहितेचे उत्तम उदाहरण आहेत. संत एकनाथ महाराजानंतर अभंगाचा प्रभावी वापर जर कोणी केला असेल तर तो संत तुकाराम महाराजांनी. परमात्मा व समाज यामध्ये सुंदर समन्वय साधण्याचे कार्य संत तुकाराम महाराजांच्या अभंगांनी केले.

'डोई वाढवूनी केश | भूते आणिती अंगास ||

मेळवूनि नर-नारी | शकून सांगती नानापरी ||

तुका म्हणे मेंद | नाही तयापाशी गोविंद ||'

वेदांचे स्तोम माजवून सामान्यांना छळणाऱ्यांचाही समाचार घ्यायला संत तुकोबा विसरत नाही. अशा दांभिकांना प्रखर शब्दात इशारा देतांना ते म्हणतात –

'वेदांचा तो अर्थ आम्हासीच ठावा |

येरांनी वाहावा भार माथा ||

खादल्याची गोठी देखिल्यासी नाही |

भार धन वाही मजूरीचे ||'

अशाप्रकारे पढीक पांडित्यावर प्रहार करून त्यांनी समाजप्रबोधनाचे महान कार्य केले. म्हणूनच सामान्यांना तुकोबा आपलेसे वाटले.

संत तुकाराम महाराजांची अभंगसंपदा अफाट अशी आहे. आज तुकोबांचे ५००० अभंग उपलब्ध आहे. जगण्याची आचारसंहिताच जणू या अभंगातून तुकारामांनी सांगितली आहे. त्यांचे सर्वच अभंगातून त्यांच्या बुध्दीमत्तेची प्रचिती वाचकांना आल्यावाचून राहात नाही. 'लोकांस सांगे ब्रम्हज्ञान, स्वतः कोरडे पाषाण' अशी समकालींनांसारखी त्यांची विचारसरणी नव्हती तर अगोदर आचरण करूनच नंतर तो विचार त्यांनी समाजाला सांगितला –

तोंडाने नुसती वटवट करणाऱ्या खोट्या संतांविषयी तुकाराम महाराज आपल्या अभंगातून म्हणतात –

'ऐसे संत जाले कळी | तोंडी तमाखूची नळी ||

स्नानसंध्या बुडविली | पुढे भांग वोढविली ||

भांगभुकी हे साधन | पची पडे मद्यपान ||

तुका म्हणे अवघे सोंग | तेथे कैचा पांडूरंग ||'

## २.२ दगडाच्या देवाला विरोध

संत तुकाराम महाराजांच्या कालखंडात काही ढोंगी पुरोहित आणि साधुंनी आपला स्वार्थ साध्य करून घेण्याकरीता दगडाच्या देवाचे स्तोम समाजात माजविले. आपल्या अपूर्ण ईच्छा पूर्ण करून घेण्यासाठी साहजिकच सामान्य व्यक्ती मुर्तीपूजेच्या आहारी गेला. अंधश्रध्देच्या खोल गर्तेत हा सामान्य व्यक्ती अधिकच गाडल्या जावू लागला. दगडाच्या देवाचे अनुष्ठाण करून त्याची विधीवत पूजा केल्यावर तो आपले इच्छित पूर्ण करतो असा समज समाजातील जनसामान्यांमध्ये वाढीस लागला. तुकाराम महाराजांनी समाजाची होणारी ही अवनती ओळखली आणि लोकांना यातून बाहेर काढण्याकरिता मूर्तीपूजेतील

फोलपणा समाजापुढे आणण्याचा प्रयत्न केला. मूर्तिपूजेला त्यांनी प्रखरपणे विरोध केला. देव हा कोणत्या दगडामध्ये वास्तव्य करीत नसून देव हा रंजल्या गांजल्यांची सेवा करण्यात आहे हे सोपे तत्व त्यांनी समाजापुढे मांडले.

हे करीत असतांना त्यांना अध्यात्माची आड घेवून समाजाला लुटणाऱ्या समाजकंटकांच्या विरोधाचा भयंकर सामना करावा लागला तरीही त्यांनी कधीही मागे वळून पाहिले नाही. संत तुकाराम महाराजांनी लौकिक व खरा पारमार्थिक विचार आपल्या अभंगातून व्यक्त केला. समाजाला खऱ्या अर्थाने विचारप्रवण करण्याचाच त्यांचा हा प्रयत्न होता.

जेव्हा एखाद्या गोष्टीचा ठाव लागत नाही तेव्हा ती गोष्ट अलौकिक वाटायला लागते व तेथेच अंधश्रध्दा जन्म घेते. यातूनच दगडाच्या देवाची निर्मिती होते. आपल्या कल्पनाशक्तीने मनुष्यानेच दगडाच्या देवाची निर्मिती केली. हे सर्व जाणीवपुर्वक करण्यात आले. मानवाच्या कल्पनाशक्तीतून निर्माण झालेल्या देवाच्या मूर्तिपूजेला प्रखर शब्दात तुकोबा महाराज विरोध करतात व असे करण्याची निरर्थकता पटवून देतात. आपल्या एका अभंगात ते म्हणतात –

‘रंडचंड शक्ती | मद्य मांस भक्षिती ||

बहिरव खंडेराव | रोटी सुटीसाठी देव ||

गणोबा विक्राळ | लाडू मोदकांचा काळ ||

मुंज्या म्हैसासुरे | हे तो कोण लेखी पोरे ||

वेताळे फेताळे | जळो त्याचे तोंड काळे ||

तुका म्हणे चित्ती | धरा रखुमाईचा पती ||’

अशाप्रकारे क्षुद्र देवतांचा विरोध करून विठ्ठल हा पर्याय सर्वसामान्यांसाठी त्यांनी उपलब्ध करून दिला. विठ्ठलाच्या मूर्तीला देव म्हणून नव्हे तर एक व्यक्ती म्हणून त्यांनी आळविले. सुखप्राप्तीच्या उद्देशानेच या शुद्र देवी-देवतांची निर्मिती झाली आहे हे सत्य त्यांनी ओळखले व खऱ्या सुखाच्या प्राप्तीकरिता विठ्ठलाचा पर्याय समाजापुढे ठेवला. व्यर्थ कर्मकांड न करता नामस्मरणाचा तुकोबांनी पुरस्कार केला.

‘धर्माचे पाळण | करणे पाखांड खंडण ||

हेचि आम्हां करणे काम | बीज वाढवावे नाम ||

तीक्ष्ण उत्तरे | हाती घेऊनि बाण फिरे ||

नाही भीड भार | तुका म्हणे साना थोर ||’

असा सोपा मंत्र समाजाला देवून संत तुकाराम महाराज पुढे म्हणतात –

‘अठरा पुराणांचे पोटी |

नामावीण नाही गोठी ||’

अशापध्दतीने अठरा पुराणांपेक्षाही जास्त महत्व त्यांनी नामस्मरणाला दिले आणि सोपा आणि सुकर भक्तीचा मार्ग तुकोबांनी समाजमनाला सांगितला. माती ही शेवटी मातीतच मिसळणार आहे, तिला देवत्व कधीही प्राप्त होवू शकत नाही म्हणून हे सर्व कर्मकांड व्यर्थ आहे असे सांगून त्यांनी समाजाची चांगलीच कानउघडणी केली. मूर्तीपुजेतील निरर्थकता विवेकनिष्ठतेने त्यांनी पटवून दिली.

‘केला मातीचा पशुपती |

परि मातीसी काय महती ||

शिवपूजा शिवासी पावे |

माती मातीमाजी समावे ||’

हे अटल सत्य पध्दतशीरपणे लोकांना समजणाऱ्या लोकभाषेतूनच त्यांनी समाजाला पटवून दिले. खोटा देव आणि देवाची खोटी भक्ती करणारे खोटे भक्त या दोघांनाही त्यांनी आपल्या वाणीतून फटकारले.

‘फटकाळ तो देव फटकाळ तो भक्त |

करवितो घात आणिका जीवा ||

तुका म्हणे अवघे फटकाळ हे जन |

अनुभवी ये खुण जाणतील ||’

अशा खोट्या भक्तीमुळे मनुष्य स्वतःचा घात तर करून घेतोच तसेच समाजाच्याही अवनतीला तो कारणीभूत ठरतो. संत तुकारामांच्या अभंगातून व्यक्त झालेले विचार एवढे प्रखर आणि रोख-ठोक होते की, त्यांच्या विचारांचा प्रभाव त्यांच्यानंतर झालेल्या संतांच्या साहित्यावर निश्चितच पडलेला दिसून येतो. संत तुकोबांच्या विचाराने प्रभावित होवून आधुनिक तुकाराम म्हणून ज्यांना ओळखले जाते ते महान समाजसुधारक संत गाडगेबाबा यांनी आपल्या देवपाटातील देव उचलून नदीत फेकून दिले यावरून त्यांच्या अभंगातील अक्षर वाङ्मयत्व प्रत्ययास येते.

## २.३ अभंगाच्या माध्यमातून समाजाला नीतिबोध

संत बहिणाबाईंनी म्हटल्याप्रमाणे तुकारामांची कविता म्हणजे संतसाहित्याचा कळसच ठरते. समाजातील लयास गेलेले नीतिमुल्य पुन्हा

रूजविण्याचा प्रयत्न त्यांनी आपल्या अभंगांतून केला. ज्यामुळे हे नीतिमुल्य समाजातून लयास जात होते त्या अंधश्रध्देला समाजातून सर्वप्रथम हद्दपार करणे गरजेचे होते. आपल्या अभंगांतून म्हणूनच त्यांनी या वाढत्या अंधश्रध्देवर ताशेरे ओढले. साऱ्या समाजाला नीतिमुल्यांची आठवण त्यांनी समाजाला करून दिली.

परिस्थितीनुसार कसे वागावे व आपल्यावर आलेल्या संकटांना दूर करण्याकरिता अंधश्रध्देच्या आहारी न जाता क्रांतीकारक पाऊल कसे उचलावे हे आपल्या रोखठोक शैलीत सांगतांना ते म्हणतात –

'पाया झाला नारू | तेथे न बांधा कापुरू ||

तेथे बिबव्याचे काम | अधमासिक तो अधम ||

देवावरी विंचू आला | देवपूजा नावडे त्याला ||

तेथे पैजारेचे काम | अधमासि तो अधम ||'

अशाप्रकारे वेळप्रसंगी जशास तसे कसे वागावे हे तुकोबा स्पष्टपणे सांगतात. संत तुकाराम महाराजांनी स्वस्थ समाजाचे स्वप्न पाहिले होते आणि अंधश्रध्दा समाजाला कमकुवत बनवत चालली होती म्हणून अंधश्रध्देवर त्यांनी आपल्या अभंगांतून प्रखर प्रहार केला.

अंधश्रध्दा वाढीस लावण्यास जबाबदार असणाऱ्या ढोंगी साधूंना त्यांना नीतिबोध शिकवायचा होता. साधू म्हणवितात, ते असे भोंदू जगामध्ये का निर्माण झाले ? आपल्या सर्वांगाला राख लावून लोकांचे डोळे चुकवून जे पापकर्म करतात, जगामध्ये वैराग्य दाखवून जे विषयांचा सोहळा भोगतात अशांबद्दल तुकाराम महाराज आपल्या अभंगांतून म्हणतात, 'अशांची कोणी संगतीही करू नये, अशा भोंदू साधूंबद्दल किती म्हणून सांगावे?'

‘ऐसे कैसे झाले भोंदू | कर्म करोनि म्हणती साधू ||१||

अंगी लावूनियां राख | डोळे झाकुनि करिती पाप ||२||

दावुनि वैराग्याची कळ | भोगी विषयांचा सोहळा ||३||

तुका म्हणे सांगो किती | जळो तयाची संगती ||४||

अशारितीने मोठमोठ्या ब्रह्मज्ञानी लोकांनाही लाळ घोटायला लावेल असे महान तत्वज्ञान त्यांनी आपल्या अभंगांतून मांडले. त्यांनी समाजाला खरे नीतिमुल्य शिकविले. दैवावर विश्वास ठेवून बसवलेल्या लोकांना त्यांनी कार्यप्रवण बनविले. संत तुकाराम महाराजांनी खरी धर्मजागृतीची बीजे समाजामध्ये रूजविली. कर्मप्रवृत्तीला खुप जास्त महत्व त्यांनी आपल्या अमृताहून जास्त गोडी प्राप्त झाली आहे.

## २.४ धर्मवेडावर आघात

आपल्या देशाचा ऱ्हास हा अति धर्मवेडामुळेच झालेला आहे. धर्मवेडे हे आपल्या अवनतीचे कारण आहे हे सत्य कोणीही नाकारू शकत नाही. संत तुकारामांनी आपल्या अभंगांतून नेमका या धर्मवेडेपणावर जोरदार आघात केले. जगामध्ये सर्वस्वी सुखी असा कोणताही मनुष्य आढळून येणार नाही. आपल्यावर आलेले संकट जेव्हा तो सहजासहजी दूर करू शकत नाही तेव्हा तो कोणत्यातरी अलौकिक शक्तीचा शोध घ्यायला लागतो आणि परावलंबी बनत जातो. अंधश्रध्देमुळे भय, शोक, दुःख आणि दीनतेच्या आहारी जातो आणि स्वत्व गमावून बसतो. सुरूवातीला आपण भारतवासी स्वावलंबी होतो. अन्न, वस्त्र, निवारा या तिन मुलभूत गरजांची पुर्तता आपल्या देशातच व्हायची परंतू आपल्यावर झालेले परकियांचे आक्रमण, त्यांची सत्ता यामुळे आपल्या गरजा

वाढीस लागल्या व आपण परावलंबी झालो. संत तुकाराम महाराजांनी ही गोष्ट हेरून स्वराज्याचा पुरस्कार केला. अंतरंग लक्षणे ही सत्य व त्रिकालाबाधित नीति यांचेवर अवलंबून असते त्यांचा ऱ्हास झाला की अवनती होणारच.

संत एकनाथ, संत तुकाराम, समर्थ रामदास यांनी आपल्या कवित्वाने लोकांची मने जिंकून धर्मजागृतीचे महत्कार्य केले. संत तुकारामांनी तर आपत्तीचा उपयोग आत्मकार्याकरीता करून घेतला. मराठी भाषेत संत तुकाराम महाराजांच्या कवितेला अनन्यसाधारण महत्व आहे. त्यांचे अभंग जणू त्यांचे नसून सर्वसामान्यांचे होवून बसले आहे. एवढे जाज्वल्य कदाचित कोणत्या कवीच्या कवितेमध्ये पाहावयास मिळते. लोकांच्याच भाषेत लोकांना त्यांनी अंधश्रध्देविरूध्द जागृत करण्याचा यशस्वी प्रयत्न केला.

'नव्हे जाखाई जोखाई | मायराणी मेसाबाई ||

बळिया माझा पंढरिराव | जो या देवांचा ही देव ||१||

रंडी चंडी शक्ती | मद्यमासांते भक्षिती ||२||

बहिरव खंडेराव | रोटीसुटीसाठी देव ||३||

गणोबा विक्राळ | लाडूमोदकांचा काळ ||४||

मुंज्या म्हैसासुरे | हे तों कोण लेखी पोरें ||५||

वेताळें फेताळें | जळों त्यांचे तोंड काळें ||६||

तुका म्हणे चित्ती | धरा रखुमाईचा पती ||७||'

अशाप्रकारे जाखाई-जोखाई या क्षुद्र देवता आहेत. त्या देवत्व पदाला कधीही प्राप्त होवू शकत नाही. माझा पंढरीराव एकटा बळीया म्हणजे बलाढ्य असून तो देवांचाही देव आहे असे रोखठोक शब्दांत सांगून रंडी-चंडी या

क्षुद्रदेवता तर केवळ मद्यमांसाचे भक्षण करतात तर बहिरोबा – खंडोबा केवळ नैवेद्यासाठी आसुसलेले आहेत. वेताळ-फेताळ इत्यादी काळतोंड्यांचे तर तोंडच जळो अशा प्रखर शब्दात ते अंधश्रध्देवर प्रहार आपल्या अभंगातून करतात. केवळ पांडूरंगाची भक्ती करून आपण त्याला प्राप्त करून घेऊ शकतो. असा हा पंढरपूरचा पांडुरंग हा देव त्यांनी सर्वसामान्यांना भक्तीकरिता उपलब्ध करून दिला. एकप्रकारे अंधश्रध्देच्या मुळावर त्यांनी केलेला हा आघातच होता.

तुकोबांची कविता आजच्या आधुनिक कवितेच्या संदर्भात अनेक नवीन प्रश्न उपस्थित करते. खरे पाहता त्यांचे अभंग अक्षरवाङ्मयाचे अत्युत्तम उदाहरण ठरते. त्यांचे अभंग केवळ कलेपुरते मर्यादित नसून ते जिवनाविषयीचे भाष्य करणारे होते यात तिळमात्र शंका नाही. त्यांच्या अभंगातील अनुभवाची समृध्दी व त्यातील ताजेपणा अजोड आहे. त्यांच्या अभंगाची भाषा जरी कडक व कलहाची असली तरी त्याला प्रेमळतेची झालर लावलेली आहे म्हणूनच अखील महाराष्ट्राने त्यांना आपलेसे मानले. तुकाराम महाराज खऱ्या अर्थाने लोकशिक्षक ठरतात.

# प्रकरण -३ रे

# जागृती आणि प्रबोधनाची लाट

## ३.१. जनसामान्यांची आंतरशुध्दी

संत तुकाराम महाराजांनी लोकमानसाच्या भावनेला बाह्यतः धक्का न लावता जनसामान्यांची आंतरशुध्दी घडवून आणली. या कारणामुळेच महाराष्ट्रातील बहुजनसमाज मोठ्या संख्येने त्यांचा अनुयायी बनला. आपल्या अभंगाद्वारे अंधश्रध्दा निर्मूलनाकरिता शब्द या माध्यमाला त्यांनी निवडले. त्यांच्याच अभंगानुसार –

‘आम्हां घरी धन शब्दांचीच रत्ने |

शब्दांचीच शस्त्रे |

यत्ने करू शब्दचि आमुच्या जीवाचे जीवन |

शब्दे वाटू धन जनलोकां |’

संत तुकारामांच्या कार्यकर्तृत्वामुळे महाराष्ट्रातील एकंदरित सर्वच स्तरांत जागृतीची आणि प्रबोधनाची लाट उसळली.

‘हरिहर सांडुनि देव | धरिती भाव क्षुल्लकी ||

ऐका त्यांची विटंबणा | देवपणा भक्तांची ||

अंगी कवळे घाली गळा | परडी कळाहीन हाती |

गळां गांठा हिंडे दारी | मनुष्य परी कुतरी ती ||’

अशाप्रकारे हरिहर या सत्यस्वरूपची देवाला सोडून देवून जे क्षुद्र देवी-देवतांची उपासना करतात त्यांची स्वतःची तर फजिती होतेच सोबतच त्यांच्या देवाचिही ते फजिती करवून घेतात. कवड्यांची माळ गळ्यात घालून आणि हाती परडी घेवून दारोदारी हिंडून भिक मागतात त्यांची कुत्र्यापेक्षा निराळी जात नसते. अशाप्रकारे समाजात अंधश्रध्दा पसरविणाऱ्या ढोंगी साधूंचा ते समाचार घेतात. त्यांच्या अशाप्रकारच्या विचारांमुळेच लोक नामगजरात आणि कीर्तनात दंग झाले हे त्यांच्या अभंगाचे मोठे यश आहे असेच म्हणावे लागेल. त्यांच्या अभंगांतील अशाप्रकारच्या विचारसरणीमुळेच पंढरीचे विठ्ठल-रखुमाई साऱ्या महाराष्ट्राचे दैवत बनले. त्यांनी आपल्या अभंगाद्वारे सदाचाराची शिकवण सर्वांना दिली.

## ३.२. सकाम भक्ती आणि धर्म

त्याकाळी सामान्य माणसे सकाम भक्तीत गुरफटत होती, सर्वत्र अंधश्रध्दा पसरली होती. क्षुद्र देवी-देवता, पीर-फकीर यांची उपासना करण्यातच लोक स्वतःला धन्य समजत होती. तुकारामांनी अशा अंधश्रध्देची डोळ्यावर झापड पडलेल्या लोकांना खडबडून जागे केले व त्यांना निष्काम भक्तीचा मार्ग दाखविला.

‘भिक्षापात्र अवलंबणे | जळो जिणे लाजिरवाणे |

ऐसियासी नारायणे | उपेक्षीजे सर्वथा ||

देवापायी नाही भाव | भक्ति वरी वरी वाव |

समर्पिला जीव | नाही तो हा व्याभिचार ||’

सकाम भक्तीत स्वतःला गुरफटून घेणे व्यर्थ आहे अशापध्दतीने धर्माच्या / अध्यात्माच्या गुरख्याखाली भिक्षा मागणाऱ्यांचे जीवनच लाजिरवाणे आहे अशा जीवनाला काहीही अर्थ नाही असे संतश्रेष्ठ तुकाराम महाराज म्हणतात अशा स्वार्थी भक्ताची देवही सदा उपेक्षाच करतो. त्याची देवावरची भक्ती केवळ दाखविण्यापुरती असते, केवळ ते एक सोंग असते. याला व्याभिचारच म्हणावे लागेल. सकाम भक्तीत गुरफटून पडलेल्या लोकांचे कधीच कल्याण होवू शकत नाही असा इशारा द्यायला सुध्दा तुकाराम महाराज विसरत नाही. मोक्षप्राप्तीचा मार्ग हा सकाम भक्तीतून जात नसून तो निष्काम भक्तीतून जातो असे सांगून लोकांच्या डोळ्यावर पडलेली अंधश्रध्देची झापड दूर करण्याचा प्रयत्न संत तुकाराम महाराजांनी केला.

## ३.३. चार्तुवर्ण्य व्यवस्था आणि अंधश्रध्दा

तुकाराम महाराजांच्या कालखंडात अंधश्रध्दा सर्वत्र फोफावण्याचे कारण त्यावेळच्या सामाजिक परिस्थितीसोबतच राजकीय परिस्थितीसुध्दा होती. त्यांच्या काळात दक्षिण भारतामध्ये सर्वत्र अशांतीचे साम्राज्य होते. परिस्थिती एवढी भीषण होती की, लोक आपल्या कर्तव्यापासून पदच्चुत झाले होते. दक्षिण भारतात बहामनी आणि मोगल यांच्यात सत्तेकरिता प्रचंड ठिणग्या उठत होत्या. त्यांच्यात सतत संघर्ष सुरू होता. तुकाराम महाराज ज्या प्रदेशात वास्तव्यास होते त्या प्रदेशात सर्वत्र दहशतीचे वातावरण पसरले होते. ही सर्व परिस्थिती अर्थातच अंधश्रध्देच्या भरणपोषणाकरिता अधिकच उपयुक्त ठरली.

समाजामध्ये चातुर्वण्य व्यवस्था अस्तित्वात होती. आपसात रोटी-बेटी व्यवहार होत नव्हता. एक वर्ण दुसऱ्या वर्णाला पाण्यात पाहात होता. सर्व धर्मात आपलाच धर्म किती श्रेष्ठ हे सिध्द करण्यातच जो-तो इतिकर्तव्यता मानत

होता. पुर्ण समाज हा क्षुद्र देवता-पुजनात दंग होता. ढोंगी-स्वार्थी साधूंचा सर्वत्र सुळसुळाट झाला होता. जाखाई-जोखाई, मेसाबाई, मायराणी आणि इतर क्षुद्र देवतांना नवस-सायास करून लोकांकडून अंधश्रध्देला अधिकच खतपाणी घातल्या जात होते. हाच जणू आपला धर्म असा सर्व लोकांचा समज झाला होता. अशा परिस्थितीत तुकाराम महाराजांनी केलेले अंधश्रध्दा निर्मूलनाचे कार्य खरोखर लक्षणीय ठरते. लोकांना त्यांनी पुन्हा वारकरी संप्रदायाची शिकवण दिली. भक्तीची सरळ सुलभ पध्दत महणून नामसंकिर्तनाची महती त्यांनी लोकांना पटवून दिली.

'पंढरीची वारी आहे माझे घरी |

आणीव न करी तीर्थव्रत ||१||

व्रत एकादशी करीन उपवासी |

गाडून अहर्निशी मुखी नाम ||२||

नाम विठोबाचे घेईन मी वाचे |

बीज कल्पांतीचे तुका म्हणे ||३||'

अशारितीने विठ्ठल हा एकमेव आराध्य आणि त्याच्या नामस्मरणाचा मंत्र त्यांनी संपूर्ण समाजाला बहाल केला. एकंदरित तुकाराम महाराजांचे जीवन आणि कार्य 'बहुजन हिताय, बहुजन सुखाय' असेच होते. त्यामध्ये स्वतःचा असा कोणताही स्वार्थ नसून समाजाप्रती त्यांची ती तळमळ होती.

जेव्हा कोणत्याही काळात शब्दाचे ज्ञान फोफावते समाजातील काही स्वार्थी माणसे धर्माचे स्वरूप बिघडवून टाकतात, समाजाचे स्वास्थ बिघडवून टाकतात. समाजामध्ये जेव्हा अंधश्रध्दा फोफावते अशावेळी संत, संतधर्म आणि संतसाहित्य प्रगट होते.

‘नका दंतकथा सांगो कोणी | कोरडे ते मानी बोल कोण ||

अनुभव येथे व्हावा शिष्टाचार | न चलती चार आम्हांपुढे ||

निवडी वेगळे क्षीर आणि पाणी | राजहंस दोन्ही वेगळाली ||

तुका म्हणे येथे पाहिजे जातीचे | येरागबाळ्याचे काय काम ||’

अशारितीने कोरड्या ब्रह्मज्ञानाच्या गोष्टी सांगणाऱ्यांचा ते निषेध करतात. आपल्या अनुभवावर त्यांना प्रचंड विश्वास आहे, अनुभवहीन शब्दांना काहीच किंमत नाही असे त्यांचे स्पष्ट मत आहे. पोकळ आचार-विचारांची तमा त्यांनी कधीच बाळगली नाही. राजहंस आपल्या चोचीने जसे दुध आणि पाणी वेगवेगळे करतो तसेच संत तुकाराम महाराज खरा भक्त आणि ढोंगी यांच्यातील फरक ओळखतात. येथे जातीचे म्हणजेच खऱ्या योग्यतेचे लोक पाहिजे असे संत तुकाराम महाराज म्हणतात. पाखंडखंडन, नीति प्रबोधन, धर्मप्रबोधन हा त्यांचा हेतू होता. ‘बुडता हे जन, न देखवे डोळा’ म्हणूनच अंतरीच्या तळमळीने संत तुकारामांच्या वाणीचा जन्म झाला आहे. या वाणीच्या मागे करूणा, भक्ती आणि वास्तल्य आहे.

## ३.४. विश्वधर्माचे प्रबोधन

अंधश्रध्देमध्ये खितपत पडलेल्या समाजाला उपदेश आणि उदाहरण या माध्यमातून संत तुकाराम महाराज विश्वधर्माचे प्रबोधन करतात. वर्णाभिमान, आश्रमाभिमान, कर्माभिमान आणि त्यापासून उत्पन्न होणाऱ्या अंधश्रध्देपासून तुकाराम महाराज पुर्णतः अलिप्त होते.

‘विष्णुमय जग वैष्णवांचा धर्म |

भेदाभेद भ्रम अमंगळ |’

वरील अभंगावरून त्यांची एकात्म सामाजिक दृष्टी व्यक्त होते. अन्याय, वाईट प्रवृत्ती, समाजात पसरलेली अंधश्रध्दा दूर व्हावीत अशी त्यांची तळमळ होती.

समाजातील अधर्म, अनैतिकता, अंधश्रध्दा, अपप्रवृत्ती दूर करण्याकरिता आसुरी संपदेचा निरास आिाण निराकरण होणे अत्यंत गरजेचे आहे असे साक्षेपी विचार संत तुकाराम महाराजांनी व्यक्त केले. अंधश्रध्देचा नाश करायचा झाल्यास सर्वात आधी अहंकार, काम, क्रोध, मोह, माया यांचा ऱ्हास होणे गरजेचे आहे तसे झाल्यास अंधश्रध्दा फार काळ तग धरून राहू शकणार नाही. अश्रध्दा, अंधश्रध्दा आणि भाबडी श्रध्दा यांच्याऐवजी सात्विक श्रध्दा हा धर्म आणि भक्ती यांचा मुलस्त्रोत असतो व दैवी सद्गुणांचा उगम असतो असे विवेकनिष्ठ विचार संत तुकाराम महाराजांनी आपल्या अभंगांतू मांडले.

‘देही असोनिया देव | वृथा फिरतो निर्देव ||

देव आहे अंतर्यामी | व्यर्थ हिंडे तीर्थग्रामी ||

नाभी मृगाचे कस्तुरी | व्यर्थ हिंडे वनांतरी ||

साखरेचे मूळ उस | तैसा देही देव दिसे ||

दुधी असता नवनीत | तेणे तयाचे मथित ||

तुका सांगे मूढजना | देही देव का पाहाना ||’

माणसामध्येच देव आहे परंतू त्याला शोधण्याकरिता तो वणवण भटकतो. देवाला तिर्थक्षेत्रात शोधण्यात काही हंशिल नाही. जसा मृगाच्या नाभित कस्तुरी असूनसुध्दा त्याचा प्रत्यय मृगाला येत नाही तशीच अवस्था अंधश्रध्देच्या

आहारी गेलेल्या व्यक्तीची होते असे साक्षेपी विचार उदाहरणासह लोकांच्या गळी उतरविण्याचा प्रयत्न संत तुकाराम महाराज आपल्या अभंगांतून करतात.

अंधश्रध्देचे मूळ कुठेतरी दारिद्य आणि त्यामुळे आलेल्या अज्ञानात दडलेले असते. दारिद्य आणि अज्ञान ओळखून त्यांचा लाभ स्वतःच्या स्वार्थाकरिता काही समाजकंटकांनी करून घेतला. मंत्र-तंत्र, गंडे-दोरे, मंत्र-ताईत यांच्या आधारे समाजामध्ये अंधश्रध्दा पसरवू पाहणाऱ्या या समाजकंटकांना संत तुकारामांनी आपल्या अभंगांतून सडकून टीका करतात. त्यांच्याच एका अभंगानुसार –

‘लांबवूनि जटा नेसोनि कासोटा | अभिमान मोठा करिताती ||

सर्वांगा करिती विभूतिलेपन | पाहाती मिष्ठान्न भक्षावया ||

तुका म्हणे त्यांचा नव्हे हा स्वधर्म | न कळता वर्म मिथ्यावाद ||’

अशाप्रकारे कासोटा घालून व लांब जटा वाढवून काही भोंदू साधू आपल्या विद्वत्तेचा आणून लोकांसमोर अभिमानाने वावरतात. संसारातून मुक्त झाल्याचा भास निर्माण करून मात्र दुसरीकडे मिष्ठान्नाची वाट पाहतात अशा ढोंगी लोकांना चेतावणी देण्यास संत तुकोबा मागे-पुढे पाहात नाही.

## ३.५. थोतांडाला कडाडून विरोध

काही सनातनी प्रवृत्तीच्या लोकांना समाजाच्या नसानसांत कर्मठपणा भरण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे सात्विक भक्तीला वेगळेच रूप प्राप्त होवून ही भक्ती दुषित झाली. अंधश्रध्देला खतपाणी देण्याकरिता पुरोहितांची पोथीनिष्ठाही कारणीभूत ठरली. समाजातील काही ढोंगी लोकांनी निष्क्रिय परलोकवाद मांडला. संत तुकाराम महाराजांनी या सर्व थोतांडाला कडाडून

विरोध केला व सर्वातर्यामी दिव्यशक्तीची जाणीव लोकांना करून दिली. नीति आणि सदाचार या दोन बाबी मानवी जीवनामध्ये अतिशय महत्वाच्या आहेत त्यांचा त्यात म्हणजे स्वतःच्या हाताने स्वतःची अवनती ओढवून घेणे होय असे प्रतिपादन तुकोबा आपल्या अभंगांतून करतात. नीती आणि सदाचार या दोन गोष्टी म्हणजे अध्यात्म आणि साक्षात्कार यांचे प्रवेशद्वार होय असे तुकोबा म्हणतात.

'मृत्युलोकी आम्हां आवडती परी | नाही एका हरिनामे विण ||

विटले हे चित्त प्रपंचापासूनि | वमन हे मनी बैसलेंसे ||

सोने रूपें आम्हां मृत्तिके समान | माणिके पाषाण खडे तैसे ||

तुका म्हणे तैशा दिसतील नारी | रिसाचियापरी आम्हांपुढे ||'

तुकाराम महाराज म्हणतात ह्या मृत्यूलोकांत आम्हाला मातीसमान वाटतात. अशाप्रकारे सर्व सुखाच्या पलीकडे गेलेले तुकाराम महाराज महाराज एक लोकोत्तर पुरूष होते यात तिळमात्र शंका नाही. तुकाराम महाराजांचा हा सर्व व्याप केवळ पाखांड्यांवर प्रहार करण्यासाठीच नव्हता तर समाजातील भाविक आणि श्रध्दाळू भक्तांना सर्वात्मक व सर्वांतर्यात्री सर्वेश्वराची निष्काम प्रेमभक्ती प्राप्त व्हावी या हेतूनेही त्यांनी हा व्याप मांडला.

अंधश्रध्देला दूर सारून, जीवनातील अनेकविध दुःखांना तोंड देत शुध्द अंतःकरणाने भगवद्भक्तीत कसे तल्लीन व्हावे हा सकळ समाजासाठी उपयुक्त असणारा मुलमंत्र त्यांनी दिला. संतश्रेष्ठ तुकाराम महाराजांनी आपले कार्य भक्तीच्या व परमेश्वर प्राप्तीच्या दिशेने आजिवन सुरू ठेवले. संत तुकारामांच्या अभंगांतून त्यांची अनुभवांची समृध्दी वाचकांना प्रत्ययाला येते. त्यांनी त्यांच्या आजुबाजूची परिस्थिती पाहिली व अंधश्रध्देला लाथाडून लोकांचा उध्दार करण्याकरिता एक जीवनधर्म आचरणात आणला. त्यांचे कवित्व तसे प्रेममय परंतू

प्रसंगी त्यांच्या लेखणीची धार व्रजापेक्षाही कठोर झालेली जाणवते. घरातील कर्त्या पुरूषाने धाकट्याला डोळे दाखववावे अशी त्यांची अधिकारी शैली आहे.

## ३.६. संत तुकारामांचे लोकोत्तर कार्य

त्यांनी आपल्या जीवनकार्यात शेवटपर्यंत भक्तीचा प्रचार-प्रसार केला. परंतू पारंपारिक भक्तीचे स्वरूप त्यांनी कधीच स्विकारले नाही तर भक्तीला एक नवीन वळण त्यांनी दिले जेणेकरून सामान्यांतील सामान्यांसाठी ही भक्ती सुलभ व्हावी आणि तो कोणत्याही अंधश्रध्देच्या आहारी जावू नये हे त्यामागचे गुपीत होते. आपल्या भक्ती आणि अभंगांद्वारे त्यांनी आयुष्यभर पाखांड खंडण केले. अंधश्रध्देचा डोलारा निर्माण करून त्याच्यावर पोट भरणाऱ्यांना त्यामुळे चांगलीच चपराक बसली. त्यांनी आपल्या जीवनकार्याचे प्रयोजनच आपल्या एका अभंगातून सांगितले आहे. ते म्हणतात –

‘धर्माचे पाळण | करणे पाखांड खंडण ||

हे चि आम्हां करणे काम | बीज वाढवावे नाम ||

तीक्ष्ण उत्तरे | हाती घेऊनि बाण फिरें ||

नाही भीड भार | तुका म्हणे साना थोर ||’

त्यांच्या एकंदरित प्रयोजनच त्यांनी वरील अभंगातून सांगितले आहे. आपल्या प्रयोजनाच्या आड येणाऱ्या कोणाचीही तमा बाळगण्यात येणार नाही असा स्पष्ट इशारा द्यायलासुध्दा ते विसरत नाही. धर्माचे पालन करणे व पाखंडी लोकांचे निर्दालन करणे हेच त्यांचे उद्दिष्ट्य त्यांनी आपल्या वरील अभंगातून सांगितले आहे. यावरून अंधश्रध्दा निर्मूलनाच्या कार्यात त्यांची भूमिका किती

महत्वाची होती हे सहज लक्षात येते. संत तुकाराम महाराजांचे कार्य व त्यांचा आत्मविश्वास पाहून त्यांचे काम कसे लोकोत्तर होते हे सहज लक्षात येते.

‘रात्रंदिवस आम्हा युध्दाचा प्रसंग |

अंतर्बाह्य जग आणि मन ||

जीवाही अगोज पडती आघात |

घेऊनिया नित्य नित्य वारू ||

तुका म्हणे तुझ्या नामाचिया बळें |

अवघीयांचे काळे केले तोंड ||’

अशारितीने दुःख आणि अपमान पचविणारे तुकाराम महाराजांनी आपला आत्मविश्वास तिळभरही ढळू दिला नाही.

त्याकाळी समाजात अंधश्रध्देचा सर्वत्र सुळसुळाट झाला होता. भोंदू-ढोंगी जागोजागी दिसून येत होते. कीर्तन/प्रवचनाच्या माध्यमांतून पोट भरण्यांची संख्या कमी नव्हती. थोडेसे ज्ञान प्राप्त करून सामान्यांना छळणे फारसे कठीण काम नव्हते आणि त्याचा पुरेपुर फायदा हे भ्रष्ट ब्राम्हण आणि पुरोहीत उचलत होते. सामान्य आणि कष्टकरी या सर्व प्रक्रियेत मात्र भरडल्या जात होता. स्वतःचे काहीतरी अस्तित्व आहे हे ही तो विसरून गेला होता. पुरोहितांकडून सामान्यांना सुखाची व धनप्राप्तीची वेगवेगळी आमिषे दाखविल्या जात होती. पैसा व धनाची अपेक्षा करून जागोजागी पारमार्थिक उपदेश केल्या जात होता. अशा स्वार्थी लोकांना तुकोबांनी चांगलेच धारेवर धरले. आपल्या एका अभंगात ते म्हणतात –

'मोले घातले रडाया | नाही आसू आणि माया ||

तैसे भक्तिवाद काय | रंगबेगडीचा न्याय ||

वेठी धरिल्या दावीभाव | मागे पळायाचा पाव ||

काजव्याच्या ज्योती | तुका म्हणे न लगे वाती ||'

पैसे देवून रडायला बोलविलेल्याच्या मनात ना कोणती आस्था असते, ना त्याच्या डोळ्यात अश्रू येतात. तसेच या पैसे घेवून तोंडवकीली करणाऱ्यांची गत असते. पैसे देवून वेठीला धरून आणलेला हमाल माल पोहचविताच तेथून निघून जातो त्याला त्या मालाशी काहीही कर्तव्य नसते. त्याचप्रकारे या ढोंगी लोकांचा भक्तीभाव आणि उपदेश पैसे प्राप्त होताच संपतो. काजव्याच्या चमकण्याने दिव्याची वात लावू शकत नाही त्याचप्रमाणे अशा अभद्र लोकांच्या उपदेशाचाही कोणताही परिणाम होत नाही झालेच तर नुकसान मात्र निश्चितपणे होते.

तुकोबांचे अंधश्रध्दाविरोधी विचार, त्यांचे समाजचिंतन त्यांचा अनुभव, त्यांनी केलेले समाजदर्शन आणि भ्रष्ट जीवनावरील त्यांनी केलेली टीका पाहता तुकाराम महाराजांचे कणखर व्यक्तिमत्व आपल्यापुढे उभे राहते. समाजातील अनिष्ट, वाईट आणि दुष्ट प्रवृत्तीचे संपूर्ण निर्दालन व्हावे म्हणून तुकोबांची वाणी मर्मग्राही व धारदार बनली आहे व त्यामुळे ती वाचकांच्या अंतःकरणाचा ठाव घेतल्यावाचून राहत नाही.

'होऊनि संन्यासी भगवी लुगडी | वासना न सोडी विषयांची ||

निंदिती कदान्न इच्छिती देवान्न | पाहाताती मान आदराचा ||

तुका म्हणे ऐसे दांभिक भजन | तया जनार्दन भेटे केवी ||'

अशाप्रकारे वरवर चांगुलपणाचा आव आणणाऱ्यांचा तुकाराम महाराज कठोर शब्दात निषेध करून त्यांना त्यांची जागा दाखवून देतात. तुकाराम महाराजांनी अंधश्रध्देविरोधी मांडलेल्या विचारांमध्ये दोन भाग सहज दिसून येतात. त्यांनी ज्याप्रमाणे ढोंगी व दांभिक लोकांवर कठोर शब्दांत टीका केली, त्याचा उपहास केला.

# प्रकरण – ४ थे

# लोककवीचा समाजाविषयीचा कळवळा

## ४.१. जिवनोध्दाराचे कार्य

मराठी वाङ्मयात संत तुकाराम महाराजांच्या अभंगवाणीचे स्थान सर्वात वरचे आहे. एकप्रकारे त्यांचे काव्य लोकांच्या मनाला जावून भिडले आहे. संत नामदेव महाराजांनी स्वप्नात दृष्टांत देवून स्वतः तुकाराम महाराज आपल्या एका अभंगात सांगतात. नामदेवांची स्वप्नात दिलेली आज्ञा शिरोधार्य मानून आपण कवित्व करण्यास सिध्द झालो असे ते स्वतः सांगतात. आपले काव्य हे केवळ मनोरंजनासाठी नसून समाजाबद्दलचा कळवळा त्यामागे आहे. पिढ्यानुपिढ्या रूढी, परंपरेच्या, अंधश्रध्देच्या आहारी जावून पिचून गेलेल्या सामान्यांना या गर्तेतून बाहेर काढण्याच्या प्रयोजनातूनच संत तुकामारांचे काव्य जन्मास आले.

आजमितीस तुकाराम महाराजांचे जवळपास ५००० अभंग उपलब्ध आहे. प्रत्येक अभंगात वाचकांच्या मनाला जावून त्याला विचारप्रवण बनविण्याचे सामर्थ्य निश्चितच आहे. लोकांना त्यांचे अभंग आपले वाटले म्हणूनच ते लोककवी या पदवीस पोहोचले. ही अभंगवाणी तुकारामांच्या अनुभव समृध्दीतून जन्माला आली आहे. त्यांचे अनुभव हे व्यक्तिगत असले तरी त्याला सर्वस्पर्शित्वाची झालर प्राप्त झाली आहे. आपले सारे हार्द त्यानीं आपल्या अभंगात आणून सोडले आहे. हे सर्व ते करू शकले ते केवळ त्यांच्या मनात असलेल्या समाजातील सामान्यांविषयीच्या कळवळ्यातून तुकारामांच्या अभंगात केवळ शब्द नव्हते. तर त्या शब्दांना अलौकिक असा अर्थ प्राप्त झाला होता. आजही हे शब्दार्थ जिवनोध्दाराचे कार्य अव्याहतपणे करीत असतांना दिसून येतात.

'अर्थेविण पाठांतर कासया करावे

व्यर्थचि मरावे घोकुनिया ||

घोकुनिया काय, वेगी अर्थ पाहे

अर्थरूप राहे होऊनिया ||

तुका म्हणे ज्याला अर्थी आहे भेटा

नाही तरी गोष्टी बोलो नका ||

अशाप्रकारे तुकाराम महाराज शब्दांबरोबरच अर्थाला सुध्दा तेवढेच महत्वाचे स्थान देतात. ज्याला जसा अर्थ हवा आहे तसा अर्थ त्यांच्या अभंगातून तो घेवू शकतो हे त्यांच्या कवित्वाचे सामर्थ्य आहे. शुध्द अंतरंगाच्या बीजापोटी जन्म घेतली असल्यामुळे त्यांची वाणी एवढी रसाळ बनली आहे. त्यांची वाणी मेणाहून मऊ असली तरी समाजात अराजक माजविणाऱ्यांसाठी ती प्रसंगी वज्रापेक्षाही कठोर असे रूप धारण करते, हे त्यांच्या कवित्वाचे मोठे वैशिष्ट्य आहे असे म्हणता येईल. त्यांच्या अभंगातून भावनेची उत्कटता आणि वाणीतील हळूवारपणा आपल्या प्रत्ययास येते. संत नामदेवानंतर थांबलेले समाजसुधारणेचे महत्वाचे कार्य संत तुकोबारायांनी पुढे चालविले आणि हा प्रवाह अव्याहतपणे पुढे सुरू ठेवला. अंधश्रध्दा निर्मूलनात त्यांचे कार्य मोठे लक्षणीय होते. म्हणून आजही त्यांच्या विचारांची गरज समाजाला भासते.

नवस-सायास, सर्व अवडंबर सोडून फक्त विठ्ठल प्राप्तीकरीता आपली भक्ती वापरा असा सल्ला जनसामान्यांना देवून त्यांनी भक्तीला बाह्य अवडंबरातून बाहेर काढून तीला अतिशय सुलभ बनविले. त्यांना स्वतः देखिल विठ्ठलाच्या भेटीची आर्त ओढ लागली आहे. त्यांच्याच एका अभंगानुसार -

'कन्या सासुरासी जाये | मागे परतोनी पाहे ||

तैसे झाले माझ्या जीवा | कधी भेटसी केशवा ||

चुकलिया माये | बाळ वेळोवेळ पाहे |

तुका तैसा तळमळी | जळावेगळी मासोळी||

अशा अभंगांतून त्यांच्या मनातील आर्तता व तडफड व्यक्त झाली आहे.

## ४.२. आनंदाचे डोही आनंद तरंग -

जीवन जगत असतांना संत तुकारामांना अनेक ठिकाणी मानहानी, निंदा सहन करावी लागली. तुकोबांसारख्या भगवत्भक्ताला हे सर्व सहन करणे अर्थातच शक्य नाही. म्हणून या सर्वातून बाहेर काढण्याकरिता ते विठ्ठलाचा धावा करतात. 'जेथे जातो तेथे पडतो मातोळा' अशी खंत व्यक्त करून ते अधिक व्यथित होतात. शेवटी त्यांना आनंदाची प्रचिती होते, 'आनंदाचे डोही आनंद तरंग |आनंदचि अंग आनंदाचे' असा एक वेगळा अनुभव त्यांना नंतर येतो.

'लग्न करू जाता म्हणती हा मातला |

न करिता जाला नपुंसक ||

निपुत्रिका म्हणती पहा हो चांडाळ |

पातकाचे मूळ पोरवडा ||

लोक जैसा ओक धरिता धरवे ना |

अभक्ता जिरे ना संतसंग ||

तुका म्हणे आता ऐकावे वचन |

त्यजुनियां जन भक्ति करा ||

अशारितीने लोक काय म्हणतील याकडे लक्ष न देता या जननिंदेला डावलून भक्ती करण्याचा सल्ला ते समाजातील सामान्य मानसाला आपल्या अभंगातून देतात व प्रत्येकासाठी भक्तीची दालने उघडून देतात.

संत तुकारामांच्या उपदेशाने अंधश्रध्दा नाकारली आहे. त्यांच्या उपदेशातील प्रमुख धागा हा भक्तीचा आहे. काही स्वार्थ ठेवून केलेली भक्ती सकाम भक्ती आणि क्षुद्र देवतांना केलेले नवस, यज्ञयाग, त्यांचे पूजन यांचा तुकाराम महाराज कडाडून विरोध करतात.

'नव्हे जाखाई जोखाई | मायराणी येसाबाई ||

बळिया माझा पंढरिराव | जो या देवांचा ही देव ||'.

असा भक्तीचा सोपा आणि सुलभ मार्ग ते लोकांना दाखवितात व हा भवसागर तरूण जाण्याचा एक मंत्र ते आपल्या अभंगातून समाजाला देवून जातात. फक्त भक्तीचा उपाय देवून ते थांबत नाहीत तर भक्तीविषयी बोलतांना आणखी ते म्हणतात की, भक्ती ही वाटते तेवढी सोपी नसून ती सुळावरील पोळी आहे, हे कठीण काम स्विकारणारा मोठ्या धैर्याचा असला पाहिजे असेही ते बजावतात. आपल्या भक्तीमध्ये नामस्मरणाला मोठे महत्व तुकाराम महाराजांनी दिले आहे. त्यांनी आयुष्यभर आपल्या अभंगांतून नामभक्तीचाच पुरस्कार केलेला दिसून येतो. यामागे कारणही तसेच होते. काही समाजकंटकांकडून समाजात रूळविलेल्या सकाम भक्तीचा त्यांना विरोध करायचा होता व सर्वांना सुलभ जाईल असा भक्तीचा प्रकार त्यांना समाजात रूजवायचा होता. प्रांजल भावनेने केलेली भक्ती संत तुकाराम महाराजांना श्रेष्ठ वाटते. भक्तीकरिता कोणत्या तिर्थक्षेत्राला जाण्याची गरज नाही अथवा त्याकरिता संसाराचाही त्याग करावा लागत नाही असे ते परखडपणे सांगतात.

समाजातून अंधश्रध्दा हद्दपार करून समाजजागृती करण्यासाठी व भक्तीचा प्रसार करण्याकरिता त्यांनी कीर्तनसंस्थेचा प्रभावी वापर करून घेतला आहे. देव, भक्त यांना जोडणारा महत्वाचा धागा म्हणजे हरिकीर्तन असे ते आपल्या अभंगांतून सांगतात. संस्कृत भाषेत बंदीस्त असलेले ज्ञान ज्या सामान्यांपर्यंत पोहोचू शकले नाही. त्यांच्याकरिता हरिकथा ऐकणे जणू अमृतापेक्षाही श्रेष्ठ ठरते. अंधश्रध्देला कारणीभूत ठरलेले जातीभेद मोडून काढण्याकरिता 'यारे सारे नारी नर | याती भलते नारी नर |' अशाप्रकारे सर्व जातीतील सर्व थरातील लोकांना ते एकत्र येण्याकरिता ते आवाहन करतात. कुळ, जाती, वर्णापेक्षा त्यांनी कर्माला अधिक महत्व दिलेले आहे. लबाडांचा आणि स्वार्थी लोकांचा संग करण्यापेक्षा संतसंगती करण्याचा उपदेश ते लोकांना करतात. संतांचा सहवास त्यांनी मोक्षसुखापेक्षाही मोठा मानला आहे. कारण संत कधीही आपल्याला वाईट मार्गावर जावू देणार नाही, असे ते ठोसपणे सांगतात. 'संत मारग चालती | त्यांची लागो मज माती' अशारितीने ते संतसंगतीचे श्रेष्ठत्व लोकांसमोर मांडतात. त्यांच्या या विचारांमुळे वारकरी संप्रदायाना नवीन रूप प्राप्त झाले आहे. म्हणून भगवतधर्माच्या मंदीराचा कळसाची जी उपमा बहिणाबाईंनी त्यांना दिली ती अगदी यथोचित ठरते.

संतश्रेष्ठ तुकाराम महाजाराजांचा मुळ पिंड हा समाजसुधारकाचा होता. हे सर्व करीत असतांना जननिंदेला त्यांनी बाजूला सारून आपले कार्य अव्याहतपणे सुरू ठेवले.

'हरिहर सांडूनि देव |

धरिती भाव क्षुल्लकी ||

ऐका त्यांची विटंबना |

देवपणा भक्तांची ||'

## ४.३. जिव्हाळ्याचा ओलावा

तुकाराम महाराजांनी आपल्या पूर्ण हयातीत क्षुद्र देवतांना अगदी कडाडून विरोध केला. हरिहराची आराधना केल्यानंतर, त्यांना देवपण बहाल केल्यानंतर क्षुद्र देवतांच्या नादी लागून आपले आयुष्य बरबाद करू नये. कारण हरिहर हेच सर्वोच्च आहेत. किंबहुना ते सर्व देवतांचेही देव आहेत. आपल्या कार्यसिध्दीसाठी देवतांना नवस बोलून वेळ व पैसा वाया घालवू नये हेच वारकरी संप्रदायाचे तत्वज्ञान संत तुकाराम महाराजांनी आपल्या अभंगातून सांगितले. बहुजन समाजाला भागवतधर्माकडे वळविण्याचे व विठ्ठलालाच आपले आराध्य बनविण्याचे तत्वज्ञान त्यांनी लोकांना सांगितले.

'नये नेत्रां जळ | नाही अंतरी कळकळ |

तो हे चावटीचे बोल | जर रंजवणे फोल ||

पोटभरू धंदा करणाऱ्या या खोट्या संतांना आपणास भरमसाठ दान मिळावे म्हणून प्रयत्न करावे लागतात. बायका पोरांना लुबाडून असे भोंदूलोक आपला स्वार्थ साध्य करून घेतात. 'लोकासांगे ब्रम्हज्ञान, स्वतः कोरडे पाषाण' या उक्तीप्रमाणे या भोंदू लोकांचे वर्तन असते. प्राणीमात्रांचे दुःख पाहून त्यांच्या डोळ्यात पाणी येत नाही म्हणूनच अनुभवाशिवाय बटबड हा केवळ एक चावटपणा होय.

'मोले घातले रडाया | नाही आसु आणि माया ||

तैसे भक्तिवाद काय | रंग बोगडीचा न्याय ||

पैसे देवून रडण्यास बोलविलेल्या लोकांच्या अंतःकरणात कोणतीच माया नसते आणि मायाच नसेल तर त्यांच्या डोळ्यात अश्रू कोठून येणार? काजव्याच्या प्रकाशाने असा अंधार दूर होत नाही. त्याचप्रमाणे ह्या भोंदू

लोकांच्या उपदेशाने परमेश्वराची प्राप्ती होत नाही, उलट मनुष्य स्वतःच्या पायावर स्वतःच धोंडा मारून घेतो. हरिभक्ती केल्याशिवाय भगवी वस्त्रे धारण करून निष्फळ उपदेश करू नये असे खडे बोल संत तुकाराम महाराज भोंदू साधूंना सुनावतात. जीवनातील सत्यचा पुरस्कार करतांनाच असत्याचा निषेधही तुकाराम महाराज करतात. म्हणूनच

'आम्हां हे कौतुक जगा द्यावी नीत |

करावे फजित चुकते जे |'

संत तुकारामांचे नाव घेतल्याबरोबर एक विलक्षण चैतन्य व एक गतिमान व्यक्तिमत्व डोळ्यांपुढे उभे राहते. साहित्यविषयक विचारांना चालना देण्याचे कार्य संत तुकोबांची कविता करते. त्यांचे अभंग जेवढे दिव्य तेवढेच गुढ आहेत. जेवढे जिव्हाळ्याच्या ओलाव्याने त्यांचे शब्द ओले झाले आहेत तेवढीच आगीची दाहकताही त्यामध्ये जाणवल्याशिवाय राहत नाही. भाषा जरी कडक व कलहाची असली तरी तृप्तीची झालर त्यांच्या भाषेला लाभली आहे.

जे अंधश्रध्दा निर्मूलनाचे कार्य आज २१ व्या शतकातही कोणाला साध्य होवू शकले नाही ते महत्कार्य संत तुकाराम महाराजांनी १७ व्या शतकात करून दाखविले. तुकाराम महाराजांची लोकप्रियता एवढी वाढली होती की, त्यांचे हे अभंग देहूच्या कर्मठवाद्यांना धर्मबाह्य वाटू लागले होते व म्हणूनच त्यांना आपल्या गावातूनच प्रचंड विरोध व्हायला लागला. कारण ज्यांनी समाजामध्ये अंधश्रध्दा पसरविली त्यांच्या मुळाशीच घाव घालण्याकरिता संत तुकारामांचे अभंग सिध्द झाले होते. हे ही तेवढेच खरे की, तुकारामांच्या अभंगाला जेवढा विरोध झाला तेवढाच त्यांचे अभंग अधिकाधिक लोकप्रिय होवू लागले व त्यांनी समाजमनाचा जणू ठाव घेतला.

## ४.४. प्रतिकुल परिस्थितीत लोकशिक्षण

समाजातील सर्वसामान्यांना भक्तीच्या मार्गाला लावून तुकाराम धर्मभ्रष्ट करीत आहे असा समज तत्कालीन पुरोहितांमध्ये झाला होता म्हणून त्यांनी तुकारामांना प्रचंड छळले, त्यांच्यावर अनन्वित अत्याचार केले, त्यांच्या अंगावर उकळते पाणी फेकायलासुध्दा त्यांनी मागेपुढे पाहिले नाही. पण एवढा छळ सहन करूनसुध्दा त्यांच्या अभंगांनी अंधश्रध्देविरूध्दचा आपला लढा अविरत सुरूच ठेवला आणि म्हणूनच ते सर्वसामान्यांच्या गळ्यातील ताईत होवून बसले.

संत तुकारामांच्या अभंगातून तत्कालीन सामाजिक परिस्थितीचे यथोचित मिश्रण आलेले आहे. तत्कालीन परिस्थिती अत्यंत वाईट व शोचनीय झाली होती. सर्वत्र ढोगी साधूंचा सुळसुळाट झाला होता. धर्माच्या नावावर मोठी ठगबाजी समाजामध्ये सुरू होती. दांभिक व संधिसाधू बुवा, ढोंगी साधू, बुवाबाजी यांचा सर्वत्र सुळसुळाट झाला होता. लोक समाजभ्रष्ट झाले होते व खऱ्या धर्मापासून दूर गेल्याने अशा ढोंगी लोकांवर विश्वास करीत होते. याच कारणामुळे समाजामध्ये सर्वत्र अंधश्रध्देचे साम्राज्य पसरले होते. अशा परिस्थितीत तुकाराम महाराजांनी लोकांनी भक्तीचा खरा मार्ग दाखविला व नामसंकिर्तनाचे महत्व त्यांना पटवून दिले. लोकांना फसविणे, धर्माच्या नावाखाली लोकांना अधोगतीला नेणे, इच्छापूर्तीसाठी नवस-सायास करणे, जादूटोणा, मंत्र-तंत्र, विविध चमत्कार यासर्व अनिष्ट गोष्टींवर तुकोबांनी प्रखर शब्दांत टीका केली. यासर्व अनिष्ट बाबींचा त्यांनी तिव्र शब्दात उपहास केला.

अर्थप्राप्ती व लोभाची इच्छा धरून भक्तीमार्गाला जावून पुजाविधी करण्यात समाज त्याकाळी दंग झाला होता. यासर्व अनिष्ट बाबींमुळे मनुष्याची अधोगती होते हे संत तुकाराम महाराजांनी जाणले व यासर्व अनिष्ट बाबींवर त्यांनी शस्त्र उगारले. संत तुकाराम महाराजांचे समाजचिंतन, समाजदर्शन व दांभिकांवर केलेली टीका पाहता त्यांचे विचार किती कणखर होते ह्याची सहज प्रचिती

आल्यावाचून राहत नाही. समाजातून अंधश्रध्दा हद्दपार व्हावी म्हणून त्यांनी आपल्या वाणीतून केलेला प्रयत्न त्यांची महानता सिध्द होते.

‘ऐसे कैसे जाले भोंदू | कर्म करोनि म्हणती साधू ||

सदा सर्वकाळ अंतरी कुटिल | तेणे गळा माळ घालू नये ||

अशा शब्दात तुकाराम महाराज दांभिक व ढोंगी लोकांनी उपहास करतात. त्यांनी काय करावे व काय करू नये याबद्दल त्यांना सल्ला देतात.

## ४.५. आदर्श लोकशिक्षक

संत तुकाराम हे खरे आदर्श लोकशिक्षक होते. याचा हवाला सामान्य जनताच नाही तर मोठमोठ्या पंडीतांनी दिलेला दिसून येतो. अशाच एका प्रसंगी तुकोबांच्या किर्तनात वामनपंडितांसारखे मोठे विद्वान बसले असतांना समाजप्रबोधनाच्या बाबतीत संत तुकारामांनी व्यक्त केलेले विचार ऐकूण वामनपंडितांनी किर्तनात उभे राहून तुकाराम महाराजांच्या अभंगाची प्रशंसा केली. एकप्रकारे पांडित्याने भक्तीला दिलेले हे प्रशस्तीपत्रच होय.

साहित्य, समाज आणि संस्कृती यांचे अतिशय अतुट असे नामे असते. प्रत्येकाचा एकमेकांवर परिणाम होत असतो. एकप्रकारे हे सर्व एकमेकांवर अवलंबून असतात. साहित्य निमिग्तीकरीता आवश्यक असलेली सर्व सामुग्री कोणत्याही साहीत्यिकाला समाजातूनच प्राप्त होत असते. खऱ्या अर्थाने समाजाचेच प्रतिबिंब कोणत्याही साहित्यात उमटत असते. तत्कालीन समाजाचे सर्वात महत्वाचे दस्तावेज म्हणून साहित्याकडे पाहिले तर ते वावगे ठरणार नाही. संत तुकारामांच्या अभंगातत सुध्दा तत्कालीन समाजजीवनाचे प्रतिबिंब पडलेले प्रकर्षाने जाणवते. संत तुकारामांची अभंगवाणी जेवढी आत्मसंवादी आहे तितकीच

ती सर्वजनसंवादी सुध्दा आहे. जनामानसाचा आवाज त्यांच्या अभंगातून परावर्तीत होत असलेला आपणास दिसून येतो.

सामाजिक विचारांवर संत तुकाराम महाराजांचे थोडेस अभंग असले तरी ते अतिशय परिणामकारक आहेत. समाजातील जातीभेद, वाढलेला कर्मठपणा, अंधश्रध्दा इत्यादी विषयांवरील त्यांचे अभंग अत्यंत उद्बोधक आहेत. त्यांच्या अभंगातून त्यांचे समाजजीवनाचे निरिक्षण किती सुक्ष्म होते त्याचा सहज प्रत्यय कोणत्याही जाणकाराला आल्याशिवाय राहत नाही.

समाजाला ज्या अनिष्ठ गोष्टींमुळे अवनती प्राप्त होत होती असे समाजजीवनातील उच्च-निच भाव, अनिष्ट रूढी, प्रथा-परंपरा, तांत्रिक-मांत्रिक, भोंदूचा प्रभाव, समाजामध्ये सर्वत्र पसरलेल्या धर्ममार्तंडांचा प्रभाव, सर्वत्र माजलेले कर्मकांडाचे स्तोम इत्यादींचे अतिशय सुक्ष्मनिरीक्षण त्यांनी केले. समाजाच्या होणाऱ्या अवनतीचे बीज समाजव्यवस्थेतच दडलेले आहे हे त्यांनी ओळखले व म्हणूनच या सर्व अनिष्ठ बाबींचे उच्चाटन करण्याकरीता ते पूर्ण ताकदीनिशी सज्ज झाले.

संत तुकाराम महाराजांनी संतत्वाचा कधीही आव आणला नाही. त्यांना साक्षात्कार झाल्यानंतर भगवे कपडे वगैरे धारण न करता किंवा कोणतेही धार्मिक आचरण न करता त्यांनी साध्या मार्गाने आपले कार्य सुरू ठेवले. त्यांना झालेला साक्षात्कार अध्यात्मिक स्वरूपाचा नसून तो अस्सल जीवनदर्शनाच्या स्वरूपाचा असा होता.

‘धर्माचे पालन | करणे पाखंड खंडण |

हेचि आम्हां करणे काम | बीज वाढवावे नाम |

(तु. गा. २१३६)

हाच त्यांचा खरा जगण्याचा उद्देश होता. आपल्या जीवनकार्यात धर्माचे पालन करणे, पाखांडाचे खंडण करून नामस्मरणाचे बीज वाढविण्याचे कार्य सत तुकारामांनी आपल्या अभंगातून केले. नामस्मरणाला अतिशय महत्व देवून अंधश्रध्देला मुठमाती देण्याचे कार्य त्यांच्या अभंगांनी अविरतपणे केले.

‘आम्हां हे कौतुक जगा द्यावी नीत |

करावे फजित चुकती ते ||

(तु. गा. अ. क्र. ८३४)

अशाप्रकारे जगाला नीती शिकविण्यातच आमच्या आयुष्याची यथार्थता आहे व समाजामध्ये अंधश्रध्देसारख्या वाईट गोष्टी पसरविणाऱ्यांची आम्ही नेहमी फजिती करतच राहू अशी ते ग्वाही देतात.

‘आम्ही वैकूंठवासी |

आलो याचि कारणाशी |

बोलिले जे ऋषी |

साचभावे वतीया |

(तु.गा.अ.क्र. ५२०)

अशाप्रकारे आपला जीवनउद्देश ते स्पष्टपणे व्यक्त करतांना आपल्या अभंगातून दिसून येतात.

संत तुकाराम महाराजांच्या अभंगाला लोकोध्दाराची प्रेरणा लाभलेली आहे. लोकजीवन आणि लोकोध्दार हाच त्यांच्या अभंगाचा मुळ आत्मा आहे. म्हणूनच त्यांचे अभंग लोकांच्या एवढे जवळ जावून लोकमय होवून जातात. संत तुकारामांनी आपल्या अभंगातून जनसामान्याला शुध्द चारित्र्याची शिकवण दिली. त्यांना एकाअर्थाने

खरा चारित्र्यवान समाज घडवायचा होता. आपण स्वतःच्या जीवाला जसे जपतो तसेच इतर प्राण्यांना सुध्दा जपणे आपले कर्तव्य आहे असे सांगून त्यांनी समाजाला भूतदया शिकविली, बळीप्रथेसारख्या अनिष्ट पध्दतीला त्यांनी कडाडून विरोध केला. एकप्रकारे अंधश्रध्दा निर्मूलनाचाच त्यांच्या हा प्रयत्न होता. अंधश्रध्देच्या खोल गर्तेत सापडलेल्या समाजाला त्यांनी सदाचार शिकविला, नीतीची शिकवण दिली व एक सुदृढ समाज निर्माण करण्याचा प्रयत्न केला.

'धर्म रक्षावयासाठी | करणे आटी आम्हांसी |

वाचा बोलो वेदनीती | करू संती केले ते ||

(तु. गा. अ. क्र. २६०)

अशारितीने धर्माचे रक्षण करण्याकरीता त्यांनी आपले संपूर्ण आयुष्य झिजविले. संतांच्या शिकवणीवर त्यांची प्रचंड श्रध्दा होती म्हणून संत ज्या मार्गावर चालले त्याच मार्गावर चालण्याची शिकवण त्यांनी समाजाला दिली. तुकाराम महाराजांनी धर्माच्या रक्षणाबरोबरच समाजातील पाखांडखंडणाची, नितीपाठ शिकवितांनाच दंभस्फोटाची जबाबदारी त्यांनी शिकविली.

# प्रकरण – ५ वे

# विवेकनिष्ठा आणि बुध्दीवाद

## ५.१. सात्विक श्रध्दा आणि अंधश्रध्दा

कोणत्याही समाजातील मानवी जीवनात श्रध्देला अत्यंत मोलाचे स्थान असते. श्रध्देशिवाय मानव जीवंतच राहू शकत नाही. त्यातही भारतीय समाजाचा विचार करू जाता येथला कोणताही व्यक्ती श्रध्दामय झालेला दिसतो. धर्माला अनन्यसाधारण महत्व येथे आहे. धर्मामुळेच श्रध्दादेखील वाढीस लागते. देवविषयक संकल्पनेस या श्रध्देचेच अधिष्ठान असते. जेव्हा एखादी गोष्ट मनुष्यासाठी अनाकलनीय असते त्यातूनच देव ही संकल्पना उदयास येते.

श्रध्दा ही जोपर्यंत विवेकपूर्ण असते तोपर्यंत ती सात्विक श्रध्दा ठरते व जेव्हा हीच श्रध्दा विवेक हरवून बसते तेव्हा तीच अंधश्रध्देचे स्वरूप धारण करते, याच श्रध्देचे विकृतीकरण होते व समाजातील काही संधीसाधू वर्ग या विकृतीकरणाला अधिकच खतपाणी घालून तिला फोफावण्यात मदत करतात. ही अंधश्रध्दा शेवटी समाजहितास अडसर ठरते. अंधश्रध्देमुळे समाजात अनेक देवीदेवतांचा समावेश होतो व लोकांना भक्तीचा खरा मार्ग कळेनासा होवून लोक सैरावैरा होतात. म्हणून संत तुकाराम महाराजांनी एकेश्वरवादाचा पुरस्कार केला. जेणेकरून लोक हतबल होवून क्षुद्र देविदेवतांच्या मागे लागू नये. भाव आणि बुध्दी यांचा सुंदर समन्वय साधण्याचा आपल्या अभंगातून त्यांनी प्रयत्न केला.

अंधश्रध्देमुळेच भक्ती आणि भाव यांच्यात भाबडेपणा निर्माण होतो. या अंधश्रध्देचे दूरगामी परिणाम समाजावर होत असल्यामुळे त्याचा प्रखर विरोध संत तुकाराम महाराजांनी केला. तुकाराम महाराजांनी अंधश्रध्देचा फोलपणा

लोकांच्या गळी उतरविला. आज एकविसाव्या शतकातही त्यांच्या विचारांचे महत्व कायम आहे, यावरून त्यांच्या विचारातील अक्षरत्व सहज कळून येते.

‘सेंदरी हे देवी दैवते | कोण ती पूजे भूते खेते |

आपल्या पोटा जी रडते | मागती शिते अवदान ||

आपुले इच्छु आणिंका पीडी | काय ते देईल बराडी |

कळो ही आली तयाची जोडी | अल्प रोकडी बुध्दी अधरा |

(तु. गा. ६५१)

अशा रोखठोक भाषेतून त्यांनी अंधश्रध्देचा समाचार घेतला. विवेकनिष्ठता हा तुकारामांच्या अभंगाचा बाणार तर होताच सोबतच त्यांनी आपल्या अभंगातून बुध्दीलाही महत्व दिलेले दिसून येते. त्यांच्याच एका अभंगात ते म्हणतात –

‘बुध्दीचा पालट धरा रे काही |

मागुती नाही मनुष्य देह ||

(तु. गा. १०६३)

## ५.२. सामाजिक विषमता नाकारली :

ज्या कोणी या विश्वाची निर्मिती केली त्या विश्वाच्या निर्मिकाने कोणत्याही प्राणिमात्रांत कोणत्याही प्रकारचा भेदभाव केला नाही. हा भेदभाव पुर्णतः मनुष्यनिर्मित आहे. तुकोबांचे कार्य याकरिता क्रांतीकारक ठरते की, त्यांनी सोळाव्या शतकात समतेचा पुरस्कार केला जेव्हा समाजामध्ये विषमता सर्वत्र

विखुरलेली होती. परिस्थिती एवढी भयावह होती की, ज्याचा आपण आज साधा विचारही करू शकत नाही. तुकाराम जातीभेद, विषमतेवर एवढे प्रखरपणे व्यक्त होवू शकले कारण त्या परिस्थितीची झळ त्यांनाही प्रत्यक्ष पोहोचली होती. त्यांनीही सामान्यांप्रमाणे सर्व भोगले होते. त्यांच्याप्रमाणे इतर संतांनादेखील जातीभेद व विषमतेची झळ पोहोचली होती. संत चोखामेळा जातीभेदाविषयी अशीच खंत आपल्या अभंगातून व्यक्त करतात. ते म्हणतात –

‘हिन याती माझी देवा |

कैसे घडे तुझी सेवा ||’

संत तुकाराम महाराजांनी जन्मापेक्षा कर्माला महत्व दिले, जातीपेक्षा गुणाला श्रेष्ठ मानले. त्याकाळात त्यांनी केलेले हे कार्य खरोखरच लक्षणीय होते. समाजसुधारणेच्या बाबतीत त्यांना बौध्दधर्माचे तत्वज्ञान मान्य होते. बौध्दधर्माने स्विकारलेल्या गुणानुसार कर्मविभाजनाचा सिध्दांत वेदविहित कर्माचे रहस्य म्हणून सांगितला आहे.

परमेश्वराने कोणताही भेद करून कोणालाही जन्माला घातले नाही. विषमतः ही मनुष्याने निर्माण केलेली जगण्यातली सर्वात मोठी अडगळ आहे. पुजनीय पद कोणत्याही जातीला प्राप्त झालेले नाही. काही स्वार्थी लोकांनी आपल्या स्वार्थापोटी स्वतःकडे हे पूजनीय पद घेतलेले आहे. जातीपेक्षा गुण कसे श्रेष्ठ हे सांगत असतांना तुकाराम महाराज आपल्या अभंगात म्हणतात –

‘कस्तुरीचे रूप अति हिनवर |

माजी असे सार मोल तया ||

आणिकही तैसी चंदनाची झाडे |

परिमळे वाढे मोल ||

ब्राम्हण श्रेष्ठ आणि इतर जाती हीन हे तत्वच त्यांना मान्य नव्हते. ब्राम्हणत्व हे जातीवर अवलंबून न राहता गुणांवर आधारित असावे असे त्यांचे स्पष्ट मत होते. तत्कालीन समाजात जातीभेदासंबंधी जो न्युनगंड निर्माण झाला होता तो न्युनगंड समाजातून घालवून सामान्यांना पुन्हा जगण्याचा अधिकार प्राप्त करून देण्याचा त्यांचा प्रयत्न होता आणि या प्रयत्नात बहुतांशी ते यशस्वीसुध्दा झाले.

‘कान्होपात्रा खोदू पिंजारी तो दादू |

भजनी अभेदी हरिचे पायी ||

चोखामेळा बंका जातीचे महार |

त्यासी सर्वेश्वर ऐक्य करी ||

(तु. गा. अ. क्र. ४२९९)

अशाप्रकारचे दाखले देत त्यांनी समाजातील भेदाभेद दूर करण्याचा प्रयत्न केला.

## ५.३. कर्मकांडावर प्रहार :

तुकारामकालीन समाजामध्ये नवस-सायास, यज्ञयाग, पुजा-पाठ, श्राध्दविधी, अंगात देवाचा संचार, भूत-प्रेत, भोंदूगिरी इत्यादींनी सर्वत्र थैमान घातले होते. मनुष्य खऱ्या सुखापासून वंचित होत चालला होता. हे हेरून संत तुकाराम महाराजांनी या अनिष्ट प्रथांच्या मुळावरच घाव केला व या अनिष्ट प्रथांचे समाजातून उच्चाटण करण्याचा प्रयत्न केला.

१) **भोंदूंचा समाचार** :

सामान्य व्यक्तीच्या श्रध्देचा गैरफायदा घेत काही समाजकंटकांनी त्यांनी कर्मकांडात चांगलेच गुरफटून ठेवले होते. सामान्य व्यक्तिसुध्दा सहजच या भोंदू लोकांच्या नादी लागत होता, त्यामागे त्यांचे अज्ञान हे एक कारण होते. अशा अज्ञानी लोकांना सज्ञान बनविण्याचे कार्य संत तुकाराम महाराजांच्या अभंगांनी केले.

'गाजराची पुंगी | तैसे नवे जाले जोगी ||'

(तु. गा. अ. क्र. २८५४)

अशाप्रकारे या भोंदूबाबांचा सर्वत्र संचार होता. अशा भोंदूगिरीविरूध्द तुकारामांनी सामान्यांना सजग केले, त्यांचे मनपरिवर्तन घडवून आणले. धर्मव्यवस्थेचे वातावरण काही अंशी आजही तसेच आहे.

२) **नवसाला विरोध** :

'नवसे कन्यापुत्र होती | तरी का कारणे लागे पती ||'

अशा मजेदार परंतू भावपूर्ण अभंगांनी त्यांनी नवस-सायास वगैरींची टर उडविली. कन्या पुत्र प्राप्त होत नसेल तर त्यात स्त्री अथवा पुरूष दोघांपैकी एकाचा दोष असेल. त्यात वैज्ञानिक वैद्यकीय, आरोग्यविषयक कारण असू शकेल, त्यात नवस काय करणार ? नवसाने जर काही साध्य झाले असते तर या जगात कोणीच दुःखी, असमाधानी राहीला नसता ही साधी शिकवण संत तुकाराम महाराजांनी आपल्या अभंगांतून दिली आहे. तुकाराम महाराज सोळाव्या शतकामध्ये विज्ञानाचे पुरस्कर्ते होते, त्यांचे विचार वैज्ञानिक होते. हा वैज्ञानिक दृष्टीकोन त्यांच्या अभंगात पदोपदी दिसून येतो.

विज्ञानाची कास धरायची शिकवण त्या काळात संत तुकाराम महाराजांनी लोकांना दिली. सामाजिक समस्यांबाबत लोकांचे प्रबोधन करणारा तुकारामांसारखा संत विरळाच म्हणावा लागेल.

३) **अभंगात देवाचा संचार** :

भोंदू लोक आपला स्वार्थ साध्य करण्याकरिता ग्रामीण भागातील लोकांना आपले लक्ष बनवितात, आपल्याकडे कोणतीतरी दैवी शक्ती असल्याचे भासवितात, आपण देवाशी संवाद साधू शकतो अशी बतावणी करतात व आठवड्यातील कोणत्यातरी वारी आपल्या अंगात कोणत्यातरी देवाचा संचार होतो असे भासवून भाबड्या लोकांना छळण्याचे कार्य सर्रासपणे सुरू राहते.

देवाचा अंगात संचार झाल्यानंतर भक्तांच्या दुःखाचे, त्यांच्या समस्यांचे निराकरण करण्याकरिता हे भोंदू उपाययोजना सुचवितात. दहा लोकांना जर उपाय सांगितले असेल तर सहजच एखाद्याच्या बाबतीत ते खरे ठरते. ज्याच्या बाबतीत हे खरे ठरलेले असते साहजिकच तो पुढे त्याचा निस्सिम भक्त बनतो व देवाने जे मागितले ते त्याला देवू करतो. ज्यांचे दुःख दूर झाले नाही त्यांना वाटते की उपाय करण्यात आपणच कुठेतरी चुकलो असेल म्हणून तो पुन्हा-पुन्हा त्या देवाकडे जावून आपले डोके गहान ठेवतो व ज्याच्या अंगात येते त्याचा धंदा मात्र तेजीत चालतो.

अशा अपप्रवृत्तींवर समाजमनाचा गाढ विश्वास बसलेला असतो. नेमका याच विश्वासाचा हे ढोंगी लोक बरोबर फायदा उचलतात व स्वतःचा लाभ करून घेतात. त्यांना समाजाविषयी किंचितही प्रेम नसते. हे चित्र पाहून तुकारामांचे मन तळमळते आणि या तळमळीपायी ते आपली वाणी झिजवितात.

‘अंगी घेऊनिया वारे दया देती | तया भक्ता हाती चोट आहे |
देव्हारा बैसोनी हालविती सुपे | ऐसी पापी पापे लिंपताती ||
एकीबेळी न्याये होतसे प्रचित | तेणे लोक समस्त भूलताती ||
तयाचे स्वाधीन दैवते असती | तरी हा मरती त्यांची पोरे |
तुका म्हणे पाणी, अंगारा जयाचा | भक्त कान्होबाबा तोही नव्हे ||

(तु. गा. अ. क्र. ४२७६)

अशाप्रकारे संत तुकाराम महाराजांनी अंगात येणाऱ्यांचे पितळ उघडे पाडले आहे. अशा लोकांना समाजातून हद्दपार करण्याचे आवाहन ते लोकांना करतात. आज एकविसाव्या शतकात ज्या विविध अंधश्रध्दा निर्मूलन समित्या कार्य करीत आहे त्या कार्याची सुरूवात सोळाव्या शतकातच संतश्रेष्ठ तुकाराम महाराजांनी केली. अंधश्रध्दा निर्मूलनाच्या कार्यातील ते आद्य प्रवर्तक होते यात तिळमात्र शंका नाही.

४) **यज्ञविधी** :

प्राचीन काळी यज्ञयाग करण्याची पध्दती प्रचलित होती. त्यामागे वैज्ञानिक कारण सुध्दा होते. वातावरणाचा समतोल साधला जावा, वातावरणातील विषारी घटक नष्ट व्हावे हा त्यामागचा उद्देश होता. कालांतराने या यज्ञ पध्दतीने अंधश्रध्देचे विकृत रूप धारण केले. यातूनच पुढे बळीप्रथेला वाव मिळायला लागला व मुळच्या चांगल्या गोष्टीचे विकृतीकरण व्हायला सुरूवात झाली. आजही प्रत्येक शुभकार्याला होम-हवन करण्याची पध्दती प्रचलित आहे. यावूरन समाजामध्ये यज्ञाने आपले पाय किती घट्ट रोवले आहे हे सहज लक्षात येते.

संत तुकाराम महाराजांनी यज्ञयाग वगैरे सर्व फोल ठरविले आहे. हा सर्व प्रकार म्हणजे वेळेचा व पैशाचा अपव्यय आहे असे प्रखरपणे सांगितले आहे.

‘यज्ञनिमित्त शरीरासी बंधन | कारे तृष्णा बायाविण वाढविली |
नव्हे ती भक्ती परलोकसाधन | विषयांनी बंधन केले तूज |
तुका म्हणे शिणसी वाया | शरण न वजता पंढरीराया |

(तु. गा. अ. क्र. १७२६)

अशा शब्दात आपल्या अभंगांतून ते लोकांना जागृत करण्याचा प्रयत्न करतात. अंधश्रध्दा निर्मूलनाच्या कार्यातील हा त्यांचा मोठा प्रयत्न होता.

५) **श्राध्दविधी/ज्योतिष/तिर्थाटन** :

कुटूंबातील एखाद्या व्यक्तीचा मृत्यू झाला असेल तर विशिष्ट दिवशी त्याच्या तृप्तीकरिता ब्राम्हणांकडून श्राध्द करवून घेण्याची पध्दती सर्वत्र अस्तित्वात आहे. भोळ्या भाबड्या लोकांचा असा समज आहे की, येथे जमिनीवरा ठेवलेले भोजन थेट मृत व्यक्तिपर्यंत स्वर्गात पोहोचते. संत तुकाराम महाराज केलेला आटापीटा आहे असे सरळ शब्दात सांगतात.

‘काय करिती काशी गंगा | भीतरी चांगा नाही तो |
अधणी कुचर बाहेर तैसा | नये रसा पाकासी ||

(तु. गा. अ. क्र. १३७)

अशापध्दतीने तिर्थाटन वगैरेला सुध्दा त्यांनी विरोध केला. मनुष्याचे अंतःकरण जर शुध्द असेल तर कोणत्याही तिर्थक्षेत्रावर जाण्याची त्याला गरजच नाही. तिर्थाटनाला जाणे म्हणजे नुसता पैशाचा व वेळेचा अपव्यय आहे. तिर्थाला जाऊन तिथली विभूती मस्तकाला लावून किंवा गंगेत स्नान करून कोणतेही पाप धुतले जात नाही. त्याकरिता मन शुध्द असावे लागते. स्वामी समर्थ रामदासांच्या विचारानुसार मन करावे प्रसन्न, सर्व सुखाचे साधन | हाच मोलाचा विचार संत तुकाराम महाराजांनी

समाजाला दिला व संत तुकाराम महाराजांचा वारसा पुढे आधुनिक तुकाराम म्हणून ओळखल्या जाणाऱ्या संत गाडगेबाबांनी चालविला.

भविष्य सांगून पोट भरणाऱ्या ज्योतिषांचाही अंधश्रध्दा वाढीमध्ये मोठा वाटा आहे. संत तुकाराम महाराज या ज्योतिषांचाही समाचार घ्यायला विसरत नाही. ज्यांना आपल्या सोबत पुढे पाच मिनीटात काय होणार आहे हे माहित नाही ते इतरांचे भविष्य काय सांगू शकतील. हा खडा सवाल ते करतात.

# प्रकरण ६ वे

# उपसंहार

महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जडणघडणीमध्ये खऱ्या अर्थाने संतसाहित्याचे मोलाचे योगदान आहे. सामाजिक, सांस्कृतिक जीवन स्वयंपूर्ण बनविण्याचे कार्य संत वाङ्मयाने केले. दीन-दलितांच्या उत्थानाची, त्यांच्या आत्मोध्दाराची तळमळ हे संतसाहित्याचे महत्वाचे वैशिष्ट्य ठरते.

अंतरीच्या तळमळीने संतांनी समाजोध्दाराकरीता वाङ्मय निर्मिती केली. समाजाविषयी असलेला विलक्षण कळवळा पदोपदी संतसाहित्यातून दिसून येतो. एकंदरित समाजोध्दार हा एकमेव उद्देश घेऊन संतसाहित्य जन्मास आले.

साधारणतः संत संप्रदायाची सुरूवात ११ व्या शतकात झाली. याच कालखंडाला मराठी वाङ्मयाचा सुवर्णकाळ असेही म्हटले जाते. याच काळात खऱ्या अर्थाने मराठी साहित्याच्या भरभराटीला सुरूवात झाली. फक्त पंडितांपुर्वी मर्यादित असलेली अशी संस्कृत भाषा होती. त्या भाषेमध्ये अडकून पडलेल्या ज्ञानाला जनसामान्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी संत तुकाराम महाराजांनी लोकभाषेचा वापर केलेला दिसून येतो. महाराष्ट्रात समाजजागृतीच्या दृष्टीने अनेक संप्रदाय उदयास आले. यापैकी एक संप्रदारय म्हणजे वारकरी संप्रदाय होय. वारकरी संप्रदायाच्या माध्यमातून संत तुकाराम महारजांनी समाजसुधारणा पर्यायाने अंधश्रध्दा निर्मूलनाचे महत्वपूर्ण कार्य केले. एक पुरोगामी विचारांचे संत असा त्यांचा उल्लेख करावा लागतो. त्यांच्या काळात समाजामध्ये अंधश्रध्देने कळस गाठला होता. स्पृश्य-अस्पृश्य, जातीभेद, वर्णभेद, सामाजिक विषमता, विधी-व्रत आदींचे प्रचंड स्तोम समाजामध्ये माजले होते. आपल्या पुरोगामी विचाराने समाजाला अंधश्रध्देच्या कचाट्यातून बाहेर काढण्याचे कार्य संत तुकारामांनी केले.

यज्ञयाग, देव-देवस्की, बळीप्रथा आदी कर्मकांडाला त्यांनी प्रचंड विरोध केला. मराठी भाषेवर त्यांचे विशेष प्रेम होते म्हणून त्यांनी आपल्या पंथाचे तत्वज्ञान मराठी भाषेतूनच लोकांना सांगितले. साध्या आणि सोप्या भक्तीमार्गाची स्थापना त्यांनी केली. आपल्या बुध्दीप्रामाण्यवादी विचारसरणीतून संत तुकारामांनी अंधश्रध्देवर आघात केले. जगाला मानवतेचा संदेश देण्याकरिताच त्यांचा जन्म झाला होता हे त्यांनी केलेल्या कार्यावरून सिध्द होते. त्यांनी समाजातील सामान्यांना कर्मकांडातून मुक्त केले व भक्तीचा सोपा मार्ग सांगितला. रोजच्या जीवनातील अनेक उदाहरण देवून मूर्तिपूजेला विरोध दर्शविला. त्यांचे विचार लौकीकाकडे जाणारे होते. सामान्यजनांच्या मनात असलेल्या पुर्वायुष्यातील अपसमजाविषयी उपदेश करून त्यांना अंधश्रध्देच्या जोखडातून मुक्त करण्याचा प्रयत्न त्यांनी केला.

त्यांच्या काळात असलेल्या कठीण परिस्थितीत समाजाची अस्मिता जागविण्याचे कार्य संत तुकाराम महाराजांनी केले. त्यांनी समाजाच्या नसांनसांत घर करून बसलेल्या धर्मभावनेला अध्यात्म विचारांची ठाम बैठक प्राप्त करून दिली. त्यांनी लोकांच्या मनात असलेल्या भक्तीला विरोध केला नाही फक्त विकृत भक्तीला योग्य वळण लावले. संत तुकाराम एक प्रभावी नितीशिक्षक म्हणून समाजामध्ये ते आपली भुमिका वठवित होते. त्यांनी सामाजिकतेची आणि नैतिकतेची शिकवण समाजाला दिली. कर्माला आणि ज्ञानाला त्यांनी आपल्या अभंगांतून प्रचंड स्थान दिले. आपल्या अभंगांतून ज्ञानप्राप्तीचा मार्ग त्यांनी सामान्यांसाठी मोकळा केला.

अवघ्या महाराष्ट्राला भागवत धर्माची शिकवण देणारा एक महत्वाचा पंथ म्हणजे वारकरी पंथ होय. जातीभेदाच्या भिंती ओलांडून अनेक जातीचे संत या संतमंडळात आले. समाजाच्या विविध स्तरातून आलेल्या या संतमंडळात एक अत्यंत तेजस्वी व अढळतारा म्हणून संत तुकारामांचा उल्लेख करावा लागतो. संत तुकारामांनी खऱ्या अर्थाने आध्यात्मिक लोकशाही समाजात रूजविली. समाजात अंधश्रध्दा पसरविणाऱ्या समाजकंटकांना ताळ्यावर आणण्याचे प्रयत्न संत तुकारामांनी आपल्या

अभंगातून केले. राजसी व तामसी वृत्ती ठेवून जगणाऱ्यांना त्यांनी झिडकारले. यावरून त्यांची जीवनदृष्टी स्पष्ट होते. परमेश्वराचे अस्तित्व त्यांना नाकारायचे नव्हते फक्त परमेश्वरावर असलेली श्रध्दा ही सात्विक असावी हे त्यांनी रोखठोकपणे सांगितले. एकंदरित दगडांच्या देवाचे अस्तित्व त्यांनी नाकारले. बळीप्रथा, कर्मकांड आदी अनिष्ट बाबींपासून लोकांना सावध करण्याचा प्रयत्न त्यांनी आपल्या अभंगातून केला.

आपल्या अभंगातून बुवाबाजीला विरोध करून त्यांनी नवसमाजनिर्मितीचा ध्यास घेतला. अंधश्रध्देला दूर सारून त्यांनी समाजामध्ये नैतिक मुल्य रुजविले. समाजातील ढोंग, दांभिकता, स्वार्थ, कर्मठता, अंधश्रध्दा व क्षुद्र देवतांची उपासना यावर संत तुकारामांनी विपुल लेखन केले व सशक्त समाज निर्माण करण्याचा प्रयत्न केला. जातीभेद विसरून गुण्यागोविंदाने नांदण्याची शिकवण संत तुकारामांनी समाजाला दिली. त्यांनी सामान्य लोकांच्या भक्ती व श्रध्देला योग्य वळण लावले. मराठी भाषेविषयीचा अभिमान त्यांच्या अभंगातून प्रत्ययास येतो.

संत बहिणाबाईंनी वर्णन केल्याप्रमाणे भागवत धर्माच्या इमारतीचा कळस होण्याचा मान ज्यांना मिळाला ते संत तुकाराम महाराज होत. लोकरंजनातून समाजप्रबोधनाचे महान कार्य संत तुकाराम महाराजांनी केले. नैतिक आचरणाची शिकवण त्यांनी समाजाला दिली.

‘कोणी निंदा कोणी वंदा |

आम्हा स्वहिताचा धंदा |

काय तुम्हासी गरज |

आम्ही भजूं पंढरिराव ||’

असे म्हणत लोकांकडून होणाऱ्या निंदेला न जुमानता त्यांनी अंधश्रध्दा निर्मूलनाचे कार्य अव्याहतपणे केले. संत एकनाथानंतर निर्माण झालेली समाजसुधारणेची पोकळी त्यांनी आपल्या कार्यकर्तृत्वाने भरून काढली.

दांभिकतेवर संत तुकाराम महाराजांनी हल्ले चढविले. नवसाने कन्या किंवा पुत्राची प्राप्ती झाली असती तर पती करण्याची गरजच उरली नसती, अशाप्रकारचा उच्चकोटीचा बुध्दीप्रामाण्यवाद त्यांनी वापरला. संत तुकाराम महाराजांनी दगडाच्या देवाला प्रचंड विरोध दर्शविला. अभंगाच्या माध्यमातून त्यांनी समाजाला नीतिबोध शिकविला. संत तुकाराम महाराजांचे प्रचंड वाङ्मयीन कार्य येणाऱ्या पिढीला निश्चितच प्रेरणा देत राहणारे असेच आहे.

निष्कर्ष

१) समाजामध्ये पसरलेल्या अंधश्रध्दा निर्मूलनाच्या कार्यामध्ये संतवाङ्मयाचे अतिशय महत्वाचे स्थान आहे.

२) समाजामध्ये जनजागृती घडवून आणण्याकरिता संतांनी ओवी, अभंग, कीर्तन, भारूड, भजन आदी अभिनव साहित्यप्रकाराचा उपयोग करून घेतला.

३) संतांनी वाङ्मयाला साध्य न मानता समाजसुधारणेचे एक साधन म्हणून त्याचा वापर केला. याच संतपरंपरेतील एक महान समाजसुधारक संत म्हणजे संत तुकाराम महाराज होय.

४) संत तुकारामांनी आपल्या वाङ्मयातून केलेले कार्य त्या-त्या परिस्थितीशी सापेक्ष असे ठरते.

५) समाजप्रबोधनाकरिता देवभाषा संस्कृतचा वापर न करता तुकारामांनी लोकभाषेचा प्रभावी वापर आपल्या वाङ्मयातून करून घेतला. लोकभाषेच्या वापरामुळेच ते समाजमनात जावून बसले. संस्कृतमध्ये बंदीस्त असलेले ज्ञान लोकभाषेच्या वापरामुळे सामान्यांसाठी खुले झाले.

६) त्यांचे तत्वज्ञान हे तर्कावर व बुध्दिप्रामाण्यावर आधारित होते. अंधश्रध्देला त्यांनी आपल्या वाङ्मयातून कधीच थारा दिला नाही.

७) तुकारामांनी त्यांच्या जीवनाशी जोडल्या गेलेल्या चमत्कारांचे सतत खंडण केले.

८) समाजात पसरलेल्या अंधश्रध्दा, कर्मकांड, पुजाविधी, नवस-सायास, दगडांचे देव, बळीप्रथा, भक्तीस्तोम आदी अनिष्ट रूढी-प्रथा नाकारून नामस्मरणाचा सोपा व सुलभ मंत्र त्यांनी आपल्या वाङ्मयातून समाजाला दिला.

९) संतवाङ्मयातून समाजाची एकंदरित सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक स्थिती संत तुकारामांनी सकर्तृत्वाने बदलविली.

१०) महाराष्ट्राचा विचार करता येथे संत, पंत आणि तंत या तीन परंपरा अतिशय महत्वाच्या ठरतात. या तीन प्रवाहात अंधश्रध्दा निर्मूलन व सामाजिक सुधारणेच्या बाबतीत विचार करू जाता, संतकाव्याची भूमिका अत्यंत महत्वाची ठरते.

११) सामाजिक आणि सांस्कृतिकदृष्ट्या एक नवीन जीवनदृष्टी संतवाङ्मयाने समाजाला प्रदान केली.

१२) संत तुकाराम महाराजांच्या वाङ्मयातून समाजाविषयी असलेली तळमळ प्रत्ययास येते.

१३) जगातील सर्व धर्माचे परस्पर सामंजस्य म्हणजे विश्वसंस्कृती, ही उदात्त शिकवण त्यांनी आपल्या साहित्यातून समाजाला बहाल केली.

१४) सर्व संतांनी दांभिकतेवर प्रहार करून अंधश्रध्दा निर्मूलनाचे कार्य सातत्याने आपल्या वाङ्मयातून केले आहे.

# परिशिष्ट

## * संदर्भग्रंथसूची *


| लेखक | | | प्रकाशक/लेख/ग्रंथ/आवृत्ती |
|---|---|---|---|
| १) | प्रा. डॉ. महल्ले (इंगोले) ममता | - | ‘लीळाचरित्रातील लोकजीवन’<br>देवयानी प्रकाशन, मुंबई<br>प्रथमावृत्ती (७ मार्च २००९) |
| २) | प्राचार्य डॉ. पाटील बी. एन. व प्रा. पाटील शिरीष बी. | - | ‘श्री चक्रधरस्वामी लीळाचरित्र एकांक’<br>प्रशांत प्रकाशन, जळगाव<br>दुसरी आवृत्ती (२०१०) |
| ३) | कोलते वि. भी. | - | ‘महानुभवांचे तत्वज्ञान’ |
| ४) | डॉ. इनामदार हे. वि. | - | ‘वेध ज्ञानेशांचा’,<br>सुविद्या प्रकाशन,<br>दुसरी आवृत्ती -२००० |
| ५) | डॉ. जोशी अ. स. | - | ‘ज्ञानेशांची संजीवन समाधी’<br>परिमळ प्रकाशन, खडकेश्वर,<br>औरंगाबाद (१९९५) |
| ६) | डॉ. इनामदार हे. वि. | - | ‘भक्तीमंदिरातील नंदादीप’<br>प्रथम आवृत्ती (२०००) |
| ७) | देव माधव रंगनाथ | - | ‘श्री ज्ञानदेव विरचित अमृतानुभव भावार्थ’<br>द्वितीय आवृत्ती (सप्टेंबर १९९२) |
| ८) | खरात शंकरराव | - | ‘संतांची सामाजिक दृष्टी’,<br>कॉन्टीनेन्टल प्रकाशन, पुणे,<br>प्रथम आवृत्ती २००५ |

| | | | |
|---|---|---|---|
| ९) | डॉ. गोसावी कुमुद | - | 'संत एकनाथाचे स्फूट लेखन प्रकाशन'<br>आचार्य गोविंद श्रीनिवास,<br>औरंगाबाद (१९८१) |
| १०) | डॉ. तुळपुळे शं. गो. | - | 'पाच संतकवी' (ज्ञानदेव, नामदेव, एकनाथ, तुकाराम, रामदास)<br>आ. द्वि. व्हिनस प्रकाशन, पुणे<br>सुविचार प्रकाशन, पुणे |
| ११) | पोहनेकर न. शे. | - | 'एकनाथ दर्शन – खंड १ ला'<br>श्री एकनाथ संशोधन मंदिर, औरंगाबाद प्रकाशन (१९५२) |
| १२) | पांगारकर ल. रा. | - | 'श्री एकनाथ महाराज चरित्र आणि वाङ्मय दर्शन' रम्यकथा प्रकाशन, पुणे<br>आवृत्ती सहावी (१९६७) |
| १३) | कर्वे इरावती | - | 'मऱ्हाटी संस्कृती काही समस्या'<br>व्हिनस प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती |
| १४) | डॉ. जोशी प्र. न. | - | 'मराठी वाङ्मयाचा विवेचक इतिहास'<br>नितीन प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती |
| १५) | नसिराबादकर ल. रा. | - | 'प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास'<br>फडके प्रकाशन, कोल्हापूर |
| १६) | डॉ. मांडे प्रभाकर | - | 'लोकसाहित्याचे स्वरूप'<br>परिमल प्रकाशन, औरंगाबाद |
| १७) | मास्तर गणपत आबाजी | - | 'संत चरित्रे' फत्तेसिंह छापखाना (१९८२) |
| १८) | पाळंबे मो. रा. | - | 'संत वाङ्मयाची सामाजिक फलश्रृती'<br>महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे (१९७९) |

| | | | |
|---|---|---|---|
| १९) | संपा. प्राचार्य भगत रा. तु. | - | ‘संतसाहित्य आणि अंधश्रध्दा निर्मूलन’ चैतन्य प्रकाशन, कोल्हापूर, प्रथम आवृत्ती (२००२) |
| २०) | कोलते वि. भि. | - | ‘प्राचीन मराठी साहित्य संशोधन’ ठोकळ प्रकाशन |
| २१) | जोशी दामोधर गणेश | - | ‘कीर्तन तारांगिणी भाग-१’ जोशी प्रकाशन |
| २२) | डॉ. ढेरे रा. चि. | - | ‘महाराष्ट्राचा देव्हारा विश्वकर्मा साहित्यकथा’ सदाशिव पेठ, पुणे, प्रथमावृत्ती (१९७८) |
| २३) | प्रा. डॉ. चांदवडकर तुषार | - | ‘संत साहित्य व लोकसाहित्य’ कुसुमाग्रज प्रकाशन, नाशिक, प्रथम आवृत्ती (जून २०१५) |
| २४) | देवडीकर वै. बाबुराव हरि | - | ‘श्री तुकाराम गाथा’ |
| २५) | श्री ज्ञानेश्वर माऊली सेवा मंडळ प्रकाशन | - | ‘वारकरी सांप्रदायिक प्रत’ दुसरी आवृत्ती |
| २६) | विष्णूबुवा जोग महाराज (संपादित) | - | ‘तुकाराम दर्शन अर्थात अभंगवाणी प्रसिध्द तुक्याची’ |
| २७) | कोलते वि. भि. | - | ‘प्राचीन मराठी साहित्य संशोधन’ |
| २८) | मंगळवेढेकर राजा | - | ‘लोकात्मा तुकाराम’ ज्योत्स्ना प्रकाशन, गिरगाव, मुंबई-४, प्रथमावृत्ती |
| २९) | साळुंके आ. ह. | - | ‘विद्रोही तुकाराम’ |
| ३०) | सावरकर सुदाम | - | ‘संतश्रेष्ठ तुकाराम : वैकुंठागमन की खुन?’ |
| ३१) | डॉ. सावरकर सुभाष (संपादीत) | - | ‘वैकुंठागमन की खुन?’ मराठी जनसाहित्य परिषद, अमरावती प्रथमावृत्ती (२०१५) |

| | | | |
|---|---|---|---|
| ३२) | बेंद्रे वा. सी. | - | ‘संत तुकाराम’ नॅशनल बुक ट्रस्ट, दिल्ली (१९९३) |
| ३३) | डॉ. तापकीर संदीप | - | ‘संतांचे भक्ती आंदोलन’<br>स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे |
| ३४) | डॉ. पाटील तानाजी | - | ‘लोकोत्तर संत तुकाराम’<br>स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे |
| ३५) | डॉ. भिंगारकर कृ. ज्ञा. | - | ‘संत तुकाराम आणि संतकवी’<br>स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे |
| ३६) | डॉ. सावरकर सुभाष | - | ‘संतवाङ्मयाचे जनसाहित्यमूल्य’<br>मराठी जनसाहित्य परिषद, अमरावती<br>प्रथमावृत्ती (२८ मार्च २०१५) |